छात्र

प्रबोधन

वर्ष ४ अंक ३
सौर आश्विन शके १९१७

ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक !

물



छात्र प्रबोधन

वर्ष ४ अंक ३
सौर फाल्गुन, शके १९१७

इवली शल्ये रुपती खुपती, मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी ने ज्योतिर्जगतात.

संपादक, प्रकाशक
महेन्द्र सेठिया
संपादक मंडळ
महेंद्र सेठिया B.E., M.Ed.
विवेक पोंक्षे M.Sc., B.Ed.
अनघा लवळेकर M.A., B.Ed.
शैलजा देशमुख M.A., M.Ed.
मुखपृष्ठ व आतील चित्रे
भास्कर सगर, पुणे.
अक्षर जुळवणी
अक्षय एंटरप्राईजेस ॲण्ड सर्व्हिसेस
५१६ ब, नारायण पेठ, पुणे-३०
संपर्क
'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी
५१० सदाशिव पेठ
पुणे ४११०३०
४७७६९१
मुद्रक
प्रबोध संपदा, पुणे - २.
वार्षिक वर्गणी
रु. ७५/-
या अंकाची किंमत
रु.६/-
नोंदणी क्रमांक
PHM/153/VIII

या अंकात दडलंय काय?

- **संवाद** २
- **'मंत्र स्वच्छतेचा...मंत्र समतेचा' आचरूया रे** ३
- **कविता पानोपानी** ८
- **असे हे गणित...चक्रव्यूह** ९
- **अष्टभुजेच्या कन्या आम्ही !** ११
- **Draw a Poem** १५
- **कथा - बुद्धदेवांची गोष्ट** १७
- **झटपट गणित** २०
- **वाचलेच पाहिजे असे काही...दुर्दम्य** २१
- **सुंदर आणि सुकर शुभेच्छापत्रे !** २३
- **अजून चालतोचि वाट - माळ हा सरेना !** २६
- **माझे आजोबा** २९
- **भारताचा स्वातंत्र्योत्तर इतिहास...** ३३
- **पूर्वेकडचा स्वातंत्र्यसूर्य**
- **समृद्धीच्या मार्गावर - शून्यातून हॉटेल विश्व** ३६
- **आधुनिक भोंडला गीते** ३९
- **एका क्षितिजाची गोष्ट** ४१
- **डोळस भटकंती - ३** ४३
- **आकाशदर्शनाचा आनंदसोहळा**
- **उपकेंद्रांचे पत्ते** ४८

कोमल वाचा दे, विमल करणी दे, विद्यावैभव दे, बहुजन मैत्री दे आम्हा !

संवाद

प्रिय प्रबोधक मित्रमैत्रिणींनो,

सहामाही परीक्षा तोंडावर असतानाच हा अंक तुमच्या हातात पडत आहे. अन् परीक्षा संपताना ज्याची तुम्ही अधीरतेने वाट पाहात आहात असा नावीन्यपूर्ण दीपावली विशेषांकही खास भेटीसह तुमच्यापर्यंत पोहोचेल.

गणेशोत्सव अन् ५ सप्टेंबरचा शिक्षकदिन काही वेगळ्या पद्धतीने साजरा केला असल्यास जरूर कळवा. ४ अंकांपूर्वी आपण एक स्पर्धा जाहीर केली होती. शालेय परीक्षेतील गुण वाढविण्याच्या संदर्भात! लक्षात आहे का? ३०-४० जणांनी गुण वाढविण्याचे आव्हान स्वीकारले आहे. अजूनही ज्यांना गेल्या वर्षीच्या वार्षिक परीक्षेतील गुणांपेक्षा १० ते १५ टक्के गुण वाढविण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याची इच्छा आहे अशांनी पत्राद्वारा आम्हाला कळवावे. (तपशीलासाठी वर्ष १ अंक - ११ पाहावा.) सहामाही परीक्षा हा त्यादृष्टीने एक मधला टप्पा म्हणूनच सर्वांनी पाहावे व उत्तम अभ्यास करून निश्चयपूर्तीच्या दृष्टीने वाटचाल करावी.

काही दिवसांपूर्वी एका मासिकात एक प्रसंग वाचला. अमेरिकेत वृत्तपत्रांची विक्री 'स्वयंसेवी' पद्धतीने केली जाते. म्हणजेच लोक रस्त्यावर ठेवलेले वृत्तपत्र घेतात व किंमती एवढे पैसे डब्यात ठेवून जातात. विक्री करायला कोणीही माणूस नसतो. तरीही फसवणुकीचे प्रकार घडत नाहीत. आपल्या इथे असे घडेल का? दुर्दैवाने याचं उत्तर नकारार्थी मिळतं. यावेळी मनात विचार आला, असं का? प्रामाणिकपणाने वागणं हे आम्ही कोणासाठी तरी, कोणीतरी असले तरच करणार की, स्वत:साठी, स्वत:ला पटले म्हणून करणार? कोणी असो अगर नसो ***मी फुकटचे घेणार नाही. मला माझ्या कष्टाइतकेच फळ मिळाले पाहिजे, फसवून मिळालेले मात्र मी घेणार नाही.*** *असे आपणच आपल्या मनाशी ठरवायला काय हरकत आहे?*

आपल्या समाजात कधी दैवी प्रकोपाची भीती तर कधी कायद्याचा बडगा यातून आपण नाईलाजाने सद्वर्तनाकडे वळतो. खरी सुसंस्कृतता अंत:करणातून यायला हवी. आता हेच पाहा ना परीक्षेच्यावेळी वर्गात पर्यवेक्षक आमच्यावर देखरेख करायला असले की मला मनापासून चीड यायची. असा आमच्यावर अविश्वास का? आम्ही प्रामाणिकपणे उत्तरपत्रिका लिहू एवढाही विश्वास आम्ही मिळवू शकत नाही का? कोणतीही परीक्षा आली की हा प्रश्न मला नेहमी अस्वस्थ करून सोडतो. तुम्हाला काय वाटतं? ''परीक्षेच्या वेळी आमच्या वर्गात कोणीही पर्यवेक्षक नको आणि तरी अत्यंत प्रामाणिकपणे व विश्वासाने आम्ही नियमांचा भंग न करता उत्तरपत्रिका लिहू.'' असे तुम्ही ठरवू शकाल का? वर्गामध्ये, शिक्षकांशी याबाबत बोलून तर पाहा. किमान चर्चा सुरू होऊ दे, या विचाराबाबत तुम्हाला काय वाटतं? परीक्षेनंतर आवर्जून लिहून पाठवा ! ***तुम्ही किती संवेदनशील वाचक आहात हे तुमच्या प्रतिसादावरून आम्हाला कळेल.***

दिवाळी सुट्टीतील तंबूतल्या शिबिरात सहभागी होताय ना? लवकरात लवकर शुल्क भरून नाव नोंदवा. विजयादशमीच्या निमित्ताने संकल्पपूर्तीसाठी 'प्रामाणिकपणे' सीमोल्लंघन करण्याचा दृढनिश्चय करा.

सस्नेह तुमचा

(महेन्द्र सेठिया)

सहामाही परीक्षेसाठी व यशस्वी सीमोल्लंघनासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !

भेदण्यास आकाशाला मग नित्य कल्पना नव्या, देहाला अन् पंखांना नित्य नव्या भराऱ्या हव्या.

'मंत्र स्वच्छतेचा...मंत्र समतेचा' आचरूया रे !!

गांधी जयंती निमित्ताने...

पंच्याहत्तर वर्षांपूर्वी मुंबईच्या एलफिन्स्टन कॉलेजमध्ये पटवर्धन नावाचा एक हुशार विद्यार्थी एम्.ए. च्या परीक्षेला बसला होता. बी.ए.ला त्याने तत्त्वज्ञान हा विषय घेऊन पहिला वर्ग मिळवला होता आणि एम्. ए. ला त्याला उत्तम गुण मिळतील अशी त्याची व त्याच्या प्राध्यापकांचीही खात्री होती. एम्.ए. झाल्यावर त्याने एलफिन्स्टन कॉलेजमध्येच शिकवायला यावे असे त्याच्या प्राध्यापकांना वाटत होते. परंतु याच वेळी महात्मा गांधींनी देशात स्वातंत्र्याची चळवळ सुरू करण्याचे जाहीर केले आणि तरुणांनी कॉलेज सोडून चळवळीत पडावे, सरकारी नोकरीत जाऊ नये असे सांगितले. पटवर्धनांनी एम्.ए. च्या परीक्षेत पहिला क्रमांक मिळविला. त्यांना त्यांच्या कॉलेजमध्ये शिकविण्याची संधी मिळणार होती, परंतु त्यांनी गांधीजींचे म्हणणे ऐकून स्वातंत्र्य चळवळीत भाग घेण्याचे ठरविले. सत्याग्रह करून ते तुरुंगात गेले. सुटून आल्यानंतर ते गांधीजींना जाऊन भेटले आणि त्यांनी विचारले ''मी आता यापुढे काय करू?'' गांधीजी म्हणाले, ''तुझा रत्नागिरी जिल्हा फार गरीब आहे. तू तेथील खेड्यात जा.'' पटवर्धन म्हणाले, ''मी खेड्यात जाऊन काय करू?'' गांधीजी म्हणाले, ''तू हातात झाडू घे आणि गावात सफाईचे काम कर. संडासही साफ करीत जा.'' पटवर्धन म्हणाले, ''यामुळे काय होईल?'' गांधीजी म्हणाले, ''आपल्या लोकांना स्वच्छता शिकवायला पाहिजे. ते काम भाषणे करून होणार नाही. तू नियमितपणे सफाई केलीस म्हणजे काही लोकांना तरी आपला गाव स्वच्छ असावा असे वाटेल. आपण संडास सफाईचे काम भंगी लोकांना करायला लावतो आणि शिवाय त्यांना दूर ठेवतो. अस्पृश्य म्हणून



वागवतो. माणसांना असे वागवणे चूक आहे. पण हे नुसते सांगून चालणार नाही. तू ब्राह्मण आहेस हे विसरून भंगी काम करायला लागलास की लोकांना आपले काय चुकते ते कळेल. शिवाय तू रोज चरख्यावर सूत काढत जा आणि डोक्यावर खादीचे गठ्ठे घेऊन गावोगाव जाऊन ते विकत जा.''

पटवर्धन म्हणाले, ''मी हे केल्याने स्वातंत्र्य कसे जवळ येईल?'' गांधीजी म्हणाले, ''तू हे करायला लागलास की लोक तुला वेडा म्हणतील. तुझ्या तोंडावर थुंकतील, तुझ्या जातीतले लोक तुला वाळीत टाकतील. पण या सगळ्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून तू काम करीत राहिलास म्हणजे दोन-तीन वर्षांनी लोक तुला 'गांधींचा माणूस' म्हणून ओळखायला लागतील. तुला काही मित्र मिळतील आणि मी जेव्हा पुन्हा स्वातंत्र्याची चळवळ करीन तेव्हा तुझ्या बरोबर तुझ्या जिल्ह्यातून पुष्कळ लोक येतील. शेतकरी प्रथम जमिनीची मशागत करतो. तशी तू लोकांच्या मनाची मशागत कर. तेथे मग देशभक्तीचे बी पेरत जा. असे काम अनेक लोकांनी अनेक वर्षे केले म्हणजे आपल्याला स्वराज्याचे भरघोस पीक मिळेल.''

पटवर्धनांना गांधीजींचे म्हणणे पटले. ते रत्नागिरी जिल्ह्यातील खेड्यामध्ये गेले. हातात झाडू घेऊन सफाईचे काम करू लागले. भंगी लोकांप्रमाणे घाण काढू

लागले. पटवर्धन खूप शिकलेले होते, हुशार होते, हे लोकांना माहीत होते. हा हुशार तरुण असा का वागतो हे त्यांना कळेना. अनेक जणांनी त्यांना वेड्यात काढले. बहुतेक सगळे जण म्हणत, ''आप्पा पटवर्धन हुशार पण चक्रम आहे. गांधींच्या नादाला लागून फुकट गेला.''

आप्पांच्या भोवती काही तरुण गोळा झाले. भाऊ तेंडुलकर, भाई शेट्ये त्यांच्या प्रमाणेच खादी वापरू लागले, सफाई करू लागले. आप्पांनी त्यांना खूप वाचायला लावले. विचार करायला शिकवले. पुढे १९३० साली गांधीजींनी स्वातंत्र्यासाठी सत्याग्रहाची चळवळ सुरू केली तेव्हा रत्नागिरी जिल्ह्यातून अनेक जण आप्पा

पटवर्धनांच्याकडे आले. त्यांना म्हणाले, ''आम्हाला सत्याग्रहाच्या चळवळीत यायचे आहे.''

आप्पा पटवर्धन आणि त्यांचे तरुण मित्र रत्नागिरी जिल्ह्यात सगळीकडे चळवळीचा प्रचार करीत फिरले. आप्पांनी जिल्ह्याच्या दक्षिण टोकाला शिरोडे या गावी मिठाचा सत्याग्रह करायचा ठरविले. शिरोड्यामध्ये वि.स.खांडेकर आणि त्यांचे मित्र एक प्रशाला चालवित असत. खांडेकर आप्पांच्या सारखेच ध्येयवादी होते. शहरात नोकरी न करता ते शिरोडे या दूरच्या लहानशा गावात शाळेत शिक्षक झाले. ते फार उत्तम शिक्षक होते. ते आपल्या विद्यार्थ्यांना गांधींचे विचार सांगत. स्वातंत्र्याचा विचार त्यांनी आपल्या विद्यार्थ्यांच्या मनात पेरला. या त्यांच्या विद्यार्थ्यांपैकी अनेकांनी सत्याग्रहाच्या वेळी स्वयंसेवकाचे काम केले. शिरोड्याला मोठा सत्याग्रह झाला. महाराष्ट्रातील अनेक ठिकाणचे लोक सत्याग्रहात आले.

पुण्याच्या टिळक विद्यापीठातून शिकवणारे आचार्य जावडेकर, बुद्ध धर्माचा अभ्यास करणारे पंडित धर्मानंद कोसांबी असे विद्वान आले. भाऊ तेंडुलकर, भाई शेट्ये यांच्या बरोबर अनेक ध्येयवादी तरुण आले. सत्याग्रह फार मोठा झाला. ब्रिटिश सरकारने चळवळ मोडून काढण्यासाठी सत्याग्रहींच्यावर लाठीमार केला. पोलिसांच्या दंडुक्यांनी, लाठ्यांनी अनेकांची डोकी फुटली, हाडे मोडली, पण सत्याग्रही भ्याले नाहीत. कोणत्याही तुकडीच्या नेत्याने हातातला तिरंगी झेंडा खाली पडू दिला नाही. सत्याग्रहींनी सरकारचा कायदा मोडून मिठाचा हा सत्याग्रह केला. सर्व सत्याग्रहींना पकडण्यात आले. कोणाला सहा महिने, कोणाला एक वर्ष अशा शिक्षा झाल्या. शेकडो सत्याग्रही आनंदाने तुरुंगात गेले. आप्पा पटवर्धनांना दहा वर्षांपूर्वीचे गांधीजींचे शब्द आठवले. गावसफाई, भंगीकाम करताना लोकांनी केलेली टवाळी आठवली. दहा वर्षांनंतर रत्नागिरीतले अनेक तरुण घोषणा देत होते, ''देशभक्त आप्पा पटवर्धनांचा विजय असो.''

गावोगाव प्रभात फेऱ्या निघत होत्या आणि त्यात मुली गाणे म्हणत होत्या, **'चरखा चला चला के, लेंगे स्वराज्य लेंगे'** शाळेतल्या मुलांनी गावोगावी वानरसेना काढली आणि ते गाणी म्हणत

''म.गांधी आले राम
त्यांचे करू चला काम
त्यांनी मारली आहे हाक
चला उठा लाख लाख.''

मुले घोषणा देत,

''नहीं रखना, नहीं रखना
ये जुलमी सरकार नहीं रखना.''

स्वराज्य मिळविणे म्हणजे नुसते ब्रिटिशांना घालवून लावणे असे गांधीजींना

वाटत नव्हते. ब्रिटिशांचे राज्य गेले पाहिजेच, परंतु त्यांच्या विरुद्ध चळवळ करताना आपण आपल्या लोकांचीही सुधारणा केली पाहिजे असे गांधीजी सांगत. त्यांनी १९०८ साली 'हिंद स्वराज्य' हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये भविष्य काळातील स्वतंत्र भारत कसा झाला पाहिजे याचे चित्र रेखाटले होते. गांधीजी म्हणत, ''स्वराज्य याचा अर्थ दिल्लीला, मुंबईला आपल्या हातात सत्ता येणे इतकाच नाही. स्वराज्य याचा माझा अर्थ ग्रामस्वराज्य असा आहे.''

गावातल्या लोकांनी उत्तम शेती करून स्वत:ला लागणारे धान्य पिकवावे, चरख्यावर सूत काढून, ते विणून गावाला लागणारे कापड गावातच निर्माण करावे, गाव लोकांनी स्वच्छ ठेवावा अशी गांधीजींची शिकवण होती. अस्पृश्यतेचा कलंक आपण धुवून काढला पाहिजे आणि गावातील सर्व जाती धर्माच्या लोकांनी भावाभावासारखे वागले पाहिजे, असे गांधीजींनी 'हिंद स्वराज्य' मध्ये लिहिले होते. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने वागविले पाहिजे. हाही विचार त्यांनी 'हिंद स्वराज्य' मध्ये मांडला होता.

शिक्षणासंबंधी गांधीजींनी पुष्कळ लिहिले आणि काही प्रयोग केले. गांधीजींना नुसते पुस्तकी शिक्षण मान्य नव्हते. आपल्या समाजात शारीरिक कष्ट करणाऱ्यांना कमी लेखतात याचे गांधीजींना वाईट वाटे. गांधीजी म्हणत, ''आपण सर्व जण समाजासाठी वेगवेगळी कामे करतो. शेतकरी धान्य पिकवतो, कुंभार मातीची भांडी बनवतो, शिक्षक शाळेत शिकवतो, कोणी कचेरीत काम करतो, इंजिनियर पूल बांधतो, तर वैद्य आजारी माणसांना औषध देतो. या कामांबद्दल प्रत्येकाला जे मिळते त्यामधून तो आणि त्याचे कुटुंब यांचा प्रपंच चालतो. ही सगळी कामे सारखीच महत्त्वाची आहेत. शेतकऱ्यापेक्षा केवळ डोक्याचे काम करणारा मोठा आहे असे मी मानीत नाही. शारीरिक श्रम हे बुद्धीच्या कामाइतकेच महत्त्वाचे आहेत. बुद्धीचे काम करणाऱ्यांनीही समाजासाठी काही शारीरिक श्रम केले पाहिजेत. शिक्षणातून श्रमाला प्रतिष्ठा मिळाली पाहिजे. शिक्षणामध्ये श्रमाचा भाग असावा असा गांधीजींचा आग्रह होता. गणित, इतिहास, भाषा, भूगोल हे विषय शिकताना मुलांना शेतात काम करायला, चरख्यावर सूत कातायला शिकविले पाहिजे असे गांधीजी म्हणत असत.

१९३७ साली गांधीजींच्या तत्त्वाप्रमाणे 'वर्धा शिक्षण योजना' सुरू करण्यात आली. परंतु 'श्रम व ज्ञान एकत्र असावेत' हा गांधीजींचा विचार शिक्षकांना नीट समजला नव्हता. त्यामुळे हा प्रयोग यशस्वी झाला नाही. गांधीजी अखेरपर्यंत सांगत, ''ग्राम स्वराज्य हवे असेल तर, शिक्षणात ज्ञानाबरोबरच श्रमालाही स्थान असले पाहिजे.''

गांधीजी सांगत की स्वदेशीचे व्रत घेतल्याशिवाय खरे स्वराज्य होणार नाही; त्याच प्रमाणे लोक जर दारूसारख्या व्यसनाला बळी पडू लागले तर स्वराज्याला अर्थच उरणार नाही. आपल्या समाजात आजही स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ४८ वर्षांनी एका बाजूला मूठभर श्रीमंत आहेत आणि दुसरीकडे कोट्यवधी लोकांना दोन वेळा पुरेसे जेवणही मिळत नाही. काही जणांना आपल्या देशात उच्च शिक्षण मिळते. इतकेच नव्हे तर त्या पुढच्या शिक्षणासाठी ते अमेरिकेत जातात. त्याच वेळी आपल्या देशातील लक्षावधी आदिवासी मुला-मुलींना प्राथमिक शिक्षण देणाऱ्या शाळाही नाहीत. गांधीजींची स्वराज्याची कल्पना यापेक्षा अगदी वेगळी होती. भारतासारख्या स्वतंत्र राष्ट्रात समता नांदू लागली तरच स्वराज्याचे सुराज्य होईल असे गांधीजी सांगत असत.

१९४८ साली गांधीजी जेथे राहात असत तेथे वार्ताहर त्यांना भेटायला गेले आणि त्यांनी गांधीजींना विचारले, ''भारताचा राष्ट्रपती कोणाला करावे असे आपल्याला वाटते?'' गांधीजींच्या शेजारी एक भंगी मुलगी उभी होती. गांधीजी वार्ताहरांना म्हणाले, ''ही मुलगी राष्ट्रपती व्हावी असे मला वाटते. हिचे मन निर्मळ आहे. आजवर ज्या समाजाला आपण अस्पृश्य म्हणून वागविले आणि ज्यांनी आपली गावे स्वच्छ राहावी म्हणून घाण काढण्याचे काम केले, त्या समाजात ही मुलगी जन्मलेली आहे म्हणून ती मला प्रिय आहे.''

१९२० साली गांधीजींनी आप्पा पटवर्धनांना जे सांगितले तेच देश स्वतंत्र झाल्यावर वेगळ्या शब्दात देशाला सांगितले. या विचारातून म.गांधींनी आदर्श समाजाची कल्पना मांडली. ही कल्पना विद्यार्थी-विद्यार्थिनींनी समजून घेतली आणि ***गांधीजींच्या अपेक्षेप्रमाणे आपल्या देशात समता नांदावी, प्रेमाचे राज्य असावे आणि आपण आपल्या श्रमांतून देश मोठा करावा, यासाठी तरुणांनी काम केले, तरच आपण गांधीजींची '१२५ वी जयंती' योग्य रीतीने साजरी केली असे म्हणता येईल.***

* *

कविता पानोपानी

गुरुवंदना

वृक्ष सावली देत राहतो – लहानथोरांना
झरा वाहतो – फुले फुलति अन् वेलीवेलींना ।।१ ।।

उंच उभवितो प्रासादच कुणी – ज्ञानाची ही गुढी
नवयुवकांची मने उमलती, येते जाते घडी ।।२।।

विद्यामंदिरी इथे आपुले थोर गुरू नांदती
नंदादीपापरी सतत ते उजळतात ज्योती।।३।।

''कर्तव्याला नित्य जागणे'' हीच रीत शिकविती
विद्या आणि कला नि शास्त्रे, सदैव संगोपिती ।।४ ।।

भावभक्तिची ओंजळ अमुची इथे आम्ही वाहतो
नव्या पिढीचे स्वप्न उद्याचे फुलताना पाहतो ।।५ ।।

अशी असावी ज्ञानमंदिरे, गुणी असावी मुले,
भारतभूच्या सेवेची दीक्षा ज्यांना मिळे ।।६ ।।

एक एक पायरी चढावी ज्ञान – मंदिराची
मनी आठवण नित्य असावी श्रीगुरुचरणांची! ।।७ ।।

वि.म. कुलकर्णी, पुणे

गाऊ गाऊ या अन् आरती

चला मुलांनो एक होऊनी
गान गाऊ या अन् आरती !

ज्या वीरांनी होळी केली
घरदारांसह प्राणाची
मुखी मंत्र जय भारतमाता
गळ्यात दोरी फासाची
त्यांचा त्याग आठविण्यास्तव
मान करू उन्नत वरती.....
चला मुलांनो !..

या वीरांना साथ ही देण्या
किती अनामिक ते असती
ध्येयाच्या पूर्णत्वासाठी
शक्ती युक्तीने ते लढती
या वीरांना मानवंदना,
उंच उंच ध्वज हा वरती ! ...
चला मुलांनो !..

विश्ववंद्य ही भारत माता
ही तर आपली माय असे
स्वातंत्र्याचा सूर्य तळपतो
ध्येय आपुले एक असे
जगात तिजला उंच करू या
आठवण ठेवू वीरांची !....
चला मुलांनो !..

सुहासिनी कुलकर्णी, नाशिक

असे हे गणित असे हे गणिती

चक्रव्यूह

डॉ. जयंत नारळीकर

महाभारतातील युद्धांत कौरव सेनापती द्रोणाचार्य यांनी 'चक्रव्यूह' रचला होता. असे म्हणतात की, त्यात सैन्याची रचना सोबतच्या आकृतीप्रमाणे होती.

(आकृती 1)

चित्रात दाखविलेल्या (आकृती 1) बाणाच्या ठिकाणी प्रवेश करायचा, तर ठळक टिंब आहे तिथे गाभ्यात पोचायचे आणि मग व्यूह 'भेदून' बाहेर पडायचे. ही कला फक्त अर्जुनालाच माहीत होती..... आणि अर्धवट (आत शिरण्यापुरती) अभिमन्यूला, अर्जुनपुत्राला. मला वाटते ठळक बाणाच्या ठिकाणी व्यूह भेदून बाहेर येता येत असावे.

हा व्यूह कसा काढायचा... किंवा याहून जटिल पण अशाच धर्तीवरील आकृत्या कशा काढाव्यात हे सोबतच्या आकृतीत (आकृती 2) पाहा. प्रथम ठळक रेषांतली आकृती काढा.

मग त्यातील A व B ही अक्षरे दोन शेजारची टोके टिंबांकित रेषेने जोडा. त्यानंतर A च्या डावीकडील आणि B च्या उजवीकडील शेजारी टोके C आणि D अशाच रेषेने जोडा. हाच क्रम चालू ठेवल्यास आकृती 1 मधील चक्रव्यूह तयार होतो. याहून मोठा व्यूह करायला आकृती 2 मध्ये 'L' आकाराच्या आणखी ठळक रेषा चारही बाजूंना काढाव्यात.



(आकृती 2)

गुंतागुंतीचे प्रकार

अशा तऱ्हेच्या गुंतागुंतीच्या आकृत्या कोड्यांच्या पुस्तकात सापडतात तर काही पुराणकाळाच्या राजवाड्यांत. लखनौ शहरातल्या बडच्या इमामबाऱ्यात 'भुलभुलैय्या' हा प्रकार पाहण्यासारखा आहे. इथे प्रत्येक वाटेच्या शेवटी दोन वाटांचे पर्याय

मिळतात... एक बरोबर तर दुसरा चूक.....पण नवख्याला ते कसे कळावे? जाणकार व्यक्ती बरोबर नसेल तर आपण असेच फिरत राहतो.



(आकृती 3)

असाच एक गुंतागुंतीचा प्रकार सोबतच्या चित्रात (आकृती 3) मध्ये पाहा. इंग्लंडच्या इतिहासात प्रसिद्ध कार्डिनल वुल्सीने बांधलेल्या हॅम्प्टन कोर्टच्या राजवाड्यातल्या (हा लंडनजवळ थेम्स नदीशेजारी आहे.) बगिच्यात ही गुंतागुंत आहे. तिचीच प्रतिकृती

आता 'आयुका' च्या उद्यानात उभारली जात आहे. यांतून बाहेर पडणे देखील अवघड आहे.

गुंतागुंतीला गणिताचे नियम!

गणितातील 'टॉपॉलॉजी' संस्थिती विषयात अशा विविध गुंतागुंतींचे वर्गीकरण केले जाते. जर गुंतागुंतीतल्या सर्व 'भिंती' परस्परांना जोडलेल्या असतील तर तिला 'सरल जोडलेली गुंतागुंत' (Simply Connected Maze) म्हणतात. अशा गुंतागुंतीतून बाहेर पडायला कुठल्याही भिंतीवर सतत एक हात (डावा/उजवा कुठलाही) ठेवून चालत राहावे. केव्हाना केव्हातरी बाहेर पडाल. हा बाहेर पडण्याचा मार्ग सगळ्यात जवळचा नसला तरी खात्रीचा आहे.

कुठल्याही गुंतागुंतीच्या आकृतीतून बाहेर पडण्याचा रामबाण उपाय आहे का? एडवर्ड लुकसच्या 1882 मध्ये प्रसिद्ध झालेल्या गणितावरील गमतींच्या एका पुस्तकात असा उपाय दिला आहे. त्याबद्दल आणि एकंदर अशा चक्रव्यूहांबद्दल एक लेख 1959 च्या जानेवार महिन्यातील 'सायंटिफिक अमेरिकन' ह्या नियतकालिकात मार्टिन गार्ड्नर याने लिहिलेला पहावा.

* * *

अष्टभुजेच्या कन्या आम्ही!

शैलजा राजे

अष्टभुजेचा वारसा आज आपण सांगतो. अष्टभुजेच्या हाती असणारी आयुधे आपल्याकडे नाहीत. परंतु आमच्याकडे आहे. फार मोठी शक्ती-आमचा आत्मविश्वास! आमची अढळ श्रद्धा!! अष्टभुजेच्या आजच्या कन्यांनी या आयुधांचा वापर केला पाहिजे. शारदोत्सवानिमित्त विशेष लेख.

परवा वर्तमानपत्रात एक बातमी वाचली. एका गावातल्या महिलांनी एकत्र येऊन गावातल्या दारुभट्ट्या उद्ध्वस्त केल्या, पोलिसांच्या मदतीशिवाय! एक गाव महिलांच्या उत्स्फूर्त सहकार्याने व्यसनमुक्त झाला. एक रस्ता फारच खराब झाला होता. येणारा-जाणारा शासनाला नावे ठेवीत होता. त्या रस्त्याच्या लगत असणाऱ्या एका गावातल्या शाळकरी मुली पुढे सरसावल्या आणि त्या चिमुरड्यांनी तो रस्ता दगडधोंडे टाकून दुरुस्त केला. त्या चिमुरड्यांच्याकडे लक्ष जाताच आसपासची अनेक मंडळी अनेक संस्था स्वत:शीच लाजल्या आणि आता तो रस्ता आजूबाजूच्या गावांचा प्रमुख रस्ता झाला आहे.

ही आणि अशी अनेक बोलकी उदाहरणे आज आपल्याला दिसताहेत. अलीकडे गाजत असलेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकातही प्रामुख्याने महिला निवडून येताहेत. सरपंचपदीही अनेक स्त्रिया काम करीत आहेत आणि पूर्वीपेक्षा अधिक चांगली ग्रामसेवा आम्हाला मिळते असा हवाला गावकरी मोकळ्या मनाने देताहेत.

हे आहे 'आमच्या महिला जाग्या होताहेत' याचे द्योतक. स्त्रीशक्ती ही किती प्रभावी असते याची ही प्रचीती ! आम्ही निर्बल, आम्ही काय पायाची दासी, आम्हाला काय कळतंय असे सदैव बोलणाऱ्या या आमच्या भगिनी हळूहळू जाग्या होताहेत आणि त्यांना येणारी ही जाण, ही जागृती फार मोठे कार्य करीत आहे, करणार आहे.

स्त्रीशक्ती हा आजचाच शब्द नाही. अनादि काळापासून या स्त्रीशक्तीचा महिमा देवादिकांनाही मान्य करावा लागला आहे. 'आई, माते' म्हणूनही तिच्या चरणांवर देवांनाही मस्तक ठेवावे लागले आहे. याची अनेक उदाहरणे आमच्या पुराण वाङ्मयात आढळतात.

अंबा, भवानी, महिषासूरमर्दिनी अशी अनेक नावे जगन्माता पार्वतीला दिली गेली आहेत! देवीचे रूप म्हणून आम्ही तिला अष्टभुजा बहाल केल्या आहेत. या अष्टभुजा केवळ अलंकाराकरिता आहेत का?

''शंखचक्रक, गदाशारंग गृहीत परमायुधैप्रसदिवैष्णवी रुपै नारायणी नमोस्तुते'' अशी आम्ही तिची प्रार्थना करतो. तिच्या हातात जी आयुधे आहेत, जी शस्त्रास्त्रे आहेत तिच्यासह 'तू आम्हाला पाव' असे आम्ही तिला वनवीत असतो. का? आम्हाला खात्री असते ती संकटनिवारक आहे. पापक्षालिनी आहे. ती सर्व मंगलमांगल्ये शिवे सर्वार्थसाधिका आहे. आम्ही मंगळवार-शुक्रवार उपास करतो पूजाअर्चा करतो पण खऱ्या अर्थाने आम्ही तिच्या उपासक आहोत का? तिच्या त्या अष्टभुजा आम्हाला नाहीत. तिच्या हाती असणारी ती विविध आयुधेही आज आमच्यापाशी नाहीत! तरीही आज आमच्यापाशी एक फार मोठी शक्ती आहे. आमचा आत्मविश्वास! या आत्मविश्वासाने आम्ही खूप काही करू शकतो आणि त्यासाठी हवी अढळ श्रद्धा!

ही श्रद्धा म्हणजे देवीच्यापुढे निरांजने ओवाळणे नाही, की कडक उपासतापास करून तिला प्रसन्न करून घेण्याची किमया नाही. आज आम्ही शिक्षित आहोत. पदव्यांची भेंडोळी जमवण्याचा ध्यास आम्ही घेतला आहे. मग हे शिक्षण घेताना वाटेल त्या अडचणीवर मात करण्याची जिद्दही अंगी असते. पण पदवीधर माणूस सुसंस्कृत असतोच असे नाही. दारुभट्ट्या उद्ध्वस्त करणाऱ्या किती महिला पदवीधारक, फार काय जेमतेम शालान्त परीक्षा गाठलेल्या असतील? फारफार तर अक्षर ओळख

असणाऱ्याही त्यात जास्त असतील. पण त्यांच्याजवळ होता आत्मविश्वास! आपल्या कामावर असणारी त्यांची श्रद्धा! आणि त्या श्रद्धेच्या जोरावरच त्या हे अतिशय मोलाचे, देशहितकारक काम करू शकल्या.

खरे तर एखाद्या चित्रपटाचे उदाहरण देण्याची ही जागा नव्हे तरीपण इथे मला 'रोजा' या चित्रपटाची आठवण आल्याशिवाय राहत नाही. एका खेड्यातील, एक अल्लड, निरागस मुलगी आपल्या पतीच्या सुटकेसाठी जी धडपड करते ती मला फार महत्त्वाची वाटते. आपल्या मनावर तिचा विश्वास असतो, श्रद्धा असते. एक साधीभोळी मुलगी, ''माझ्या पतीची मी सुटका करीनच'' याविश्वासाने ती वावरते, एकटी एका लष्करी ठाण्यात रात्रभर बसून राहते. कशाच्या बळावर? तर तिच्याजवळ एकच शस्त्र असते आणि ते म्हणजे तिची निर्भयता आणि तिचा स्वत:वर असलेला विलक्षण विश्वास! आणि ती जे करते आहे त्या कार्यावरची तिची अढळ श्रद्धा! तिच्या या लोकविलक्षण श्रद्धेमुळेच तिला प्रामाणिक असा एक सहकारी मिळतो, लष्करातला एक मोठा अधिकारी तिच्या भावनांची कदर करतो.

हे असे चित्रपट पाहायचे आणि त्यातील गाणी न् गोष्टी यांची लज्जत चाखायचा यासाठी ते नसतात. तो चित्रपट पाहून आले अन् मनात आले, खरोखर आजच्या काळातली तेजस्विनीच ती रोजा!

देवीची निव्वळ आराधना करीत बसणे हे आजच्या काळात साजेसे नाही. पूजा, प्रवचन, अनुष्ठाने या गोष्टींमध्येच धन्यता मानून चालणार नाही. या सर्वांना वेळही नाही. तरीपण आम्ही वेळात वेळ काढून आत्मचिंतन करू शकतो. अभ्यासासाठी कधीकधी आम्हाला रामायण-महाभारत वाचावे लागते. इतिहासाचा अभ्यास करावा लागतो. परीक्षेत गुण मिळविण्यासाठी आम्ही या गोष्टी वाचतो, पाठांतरही करतो, पण त्याचे मन:पूर्वक मनन किती करतो? आज आम्ही सर्वाधिक महत्त्व कशाला देतो? आमचे जीवन किती न् कसे स्वकेंद्रीत झाले आहे याचा विचार करतो का एखादा क्षण? आम्हाला नेहमी दुसऱ्यांचीच वानगीदाखल उदाहरणे का लागतात! नीट डोळसपणे पाहिलं तर लक्षात येईल आमच्या घराघरातूनच नव्हे तर एखाद्या चंद्रमौळी झोपडीतही आम्हाला स्त्रीशक्तीचे दर्शन होते. अन्यायाचा प्रतिकार हेच स्त्रीशक्तीचे निदर्शन नव्हे का?

स्वत:ला आम्ही कमी लेखतो का? 'नाही' असेच उत्तर देता येईल. लहानसहान गोष्टीतही आम्ही आमची अस्मिता, आमचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व, समान हक्क वगैरे वगैरे गोष्टींचा विचार करतो. पण एखादा क्षणतरी आम्ही दुसऱ्या व्यक्तिमत्त्वाला मानण्यासाठी स्वत:शी हार खातो का? पती हा परमेश्वर ही संकल्पना आता बहुतांशी नाहीशीच झाली आहे आणि ते योग्यच आहे तरीपण पती हा

आपला सहचर आहे. सवंगडी आहे हे तर मान्य करायला हरकत नसावी. कोणत्याही खेळात जीत हवी असेल तर सवंगड्याचं सहकार्य लागते. मग संसार हा तर जीवनभराचा एक खेळ आहे. आपण मांडलेला डाव शेवटपर्यंत नेटकेपणाने खेळायचा असतो. तरच जीत होते. प्रतिस्पर्ध्यावर मात करता येते, हे विसरून चालणार नाही.

आमच्या अंबा, भवानी, वैष्णवी आदि देवतांनी माजलेल्या आसूरांचा नायनाट केला. आजही आमच्या भोवती अनेक आसूरांनी थैमान घातले आहे. अन्याय, भ्रष्टाचार, स्त्रियांच्या अब्रूशी खेळ, चोऱ्यामाऱ्या, दरोडे हे सारे आजचे राक्षसच! रामायणात एकच रावण होता. रावण होता, तरी काही नेमनियम पाळणारा होता. पण आज असे सीताहरण करणारे रावण अवतीभवती कितीतरी आहेत. सीतेच्या अनुमतीशिवाय आपल्या ताब्यात असणाऱ्या सीतेला त्याने हात लावला नव्हता. पण आज वयाचा, नात्याचा कशाचाही मुलाहिजा न ठेवता अत्याचार होताहेत! त्याचा प्रतिकार करण्याची शक्ती आम्हाला मिळवायची आहे. अत्याचार झालेल्या स्त्रीला समाजात स्थान न देता, तिला जीवनातून उठवणाऱ्याला आम्ही एकत्रित, संघटित होऊन शासन केले पाहिजे. आमची संघटित, आत्मोबलशाली शक्ती हिच आमची देवीची उपासना! आणि देवीची उपासना म्हणजे शक्तीची उपासना, आमच्या मनोबलाची उपासना!

आज गावोगावी, गल्लीबोळात महिला मंडळे निर्माण झाली आहेत. या मंडळांतून एखाद्या अन्यायाचा निषेध करण्याचा ठराव पास होतो. पण असा नुसता ठराव करण्याऐवजी जिथे कुठे, कुणी असा अन्याय केला असेल तिथे संघटितपणाने जाऊन कठोर शासन करण्याची ताकद या मंडळात यावी! अशी ताकद येणे हीच खरी या विश्वंभराची उपासना. नवरात्रीचे नऊ दिवस आम्हाला काय सांगतात? त्या नवरात्रीत देवीची सजावट करण्यापेक्षा आपल्या सभोवतीच्या एखाद्या स्त्रीचा जरी दु:खभार हलका केला तरी मला वाटतं ती जगदंबा मनोमनी संतोष पावेल.

आम्ही या भारताच्या नारी! भारतीय संस्कृतीच्या रक्षक! स्वत:ला अष्टभुजेच्या कन्या म्हणवून घेण्यासाठी आम्हाला आमच्या मनाचे दौर्बल्य, अगतिकत्व दूर सारून उभे राहिले पाहिजे. 'सर्व दु:खे हरे देवी' अशी तिची प्रार्थना करण्यापेक्षा मीच स्वत: सर्व दु:खहारिणी होईन असा निर्धार केला पाहिजे. आम्हीच आमची वेगळ्या पण योग्य अर्थाची उपासना केली पाहिजे. एक महत्त्वाची गोष्ट! श्रद्धेचे फळ मिळविण्यापेक्षा श्रद्धेने बळ मिळविले पाहिजे. श्रद्धा आणि शक्ती हीच खरी जगदंबेची रूपे हे ध्यानी धरल्यास आम्ही आमचे उद्दिष्ट सहज साध्य करू शकतो.

* * *

आश्विन येता खुलून दिसे माळरानावर आभाळी आभा। सहस्त्र भिंगात कवडशांची डोळे पाहातात किरण शोभा।

Draw a Poem

Vaishali Naik

English is a fun

Surprised to read the title? You can draw a picture, a figure but poem - impossible ! But wait a minute, read this article and learn how to draw a poem. But before drawing a poem, let us first learn how to write short, simple poems on simple topics. The first thing to do is to write down all the words connected with the topic. Let's take the topic - 'Butterflies'. What things can you connect with butterflies? colour, flower, lovely, pretty etc. Now the second step is to find words rhyming with these words. The rhyming words are words which have similar sounds in the end (for eg: ball-wall, cat-mat, sky-why etc.) Suppose we rhyme the above words like flower-tower, lovely-lively etc. Now the last step is to make simple lines containing these rhyming words at the end (one word in each line followed by its pair in the next line. So let's see how this poem on 'Butterflies' can be written -

I love butterflies
They can talk with skies
They go from flower to flower,
I like to watch this from
a high tower
They are so lovely
and their colours are so lively
Yellow, Green, Gold and Red
They look pretty on a flower
bed.



Now the poem is ready so let's draw it. How? Very simple - just write the above lines in the shape of a butterfly first, sketch the shape of butterfly and write the lines in this sketch, in this way -

Simple isn't it? So now you too can draw poems on many topics - trees, star etc. Here's a poem on Trees -



How kind are the trees
They give a lot of things - free!
They give us our daily food
but like fools, we cut them for wood
When we want to really rest
and if we go to a forest,
We see the greenery
and forget all our worry
So let us all decide
to plant trees far and wide

Now try to draw this poem a small sketch is given to give you an idea. Just draw it in a bigger size and write the poem in it.

Given below is the shape of a star and some rhyming words. See if you can first write a simple poem using the words and then write these lines in the sketch. And your star is ready! (you may add your own rhyming words or leave some of the given ones - it is not necessary to include all these words in your poem.)



When you draw these poems, do send your 'Stars' and 'Trees' to us - the best "poem - drawing" will be declared. So hurry up, and start writing (and drawing) these poems.

***

Gain cannot be made without some other persons loss.

बुद्धदेवांची गोष्ट

राजा मंगळवेढेकर

बुद्धदेवांची एक छान गोष्ट आहे. बुद्धांच्या पुष्कळ गोष्टी आहेत. आठवणीसारख्या. लहान-लहान, छोट्या-छोट्या.

पण बुद्धांच्या गोष्टी लहान असल्या तरी महान आहेत. त्या आहेत आकारानं लहान, पण आशयानं, अर्थानं आहेत महान! साधीच गोष्ट, पण शिकवण श्रेष्ठ! अर्थात घेणाऱ्याला. बुद्ध शिकवायचं म्हणून शिकवत नाही. घेणारा किंवा शिकणारा शिकायचं म्हणून शिकत नाही. देण्या-घेण्याचा व्यवहार शिक्षणात संभवतच नाही. जिथं हा व्यवहार चालतो, तिथं व्यवहाराची केवळ बाजारपेठ उरते, खरे शिक्षण संपते.

बुद्धांचं देणं देण्यासाठी नसते, ते त्यांच्या आचारविचारातून सहजपणे उलगडतं, उमटतं...

बुद्धांच्या अशा सहज, स्वाभाविक उमलणाऱ्या गोष्टींपैकीच ही एक :

एकदा बुद्धदेव निघाले होते एका गावातून दुसऱ्या गावाला. परिक्रमा करीत. पदयात्रेनं. अशा प्रवासाला ते 'परिक्रमा' म्हणायचे. जाता जाता सकाळ गेली. दुपार आली. उन्हाचं कोमलपण हरपलं, ते तापलं. निबर झालं. थोडा वेळ रस्त्याच्या कडेला असलेल्या एका घनदाट पानांच्या वृक्षाखाली शीतल सावलीत ते थांबले. रस्त्याच्या पलीकडचं एक शेत दिसत होतं. ते शेत होतं भारद्वाज ब्राह्मणाचं. भारद्वाज ब्राह्मण होता. शेती करीत होता. म्हणून शेतकरीही होता.

दुपारची जेवणवेळ झाली, तशी भारद्वाज आणि शेतावर काम करणारी मंडळी तशाच एका झाडाच्या सावलीत गोळा झाली. हातपाय स्वच्छ धुऊन बसली. भारद्वाज त्यांना अन्न वाढू लागला. भुकेजलेली, कष्टकरी मंडळी जेवू लागली.

रस्त्याच्या अलीकडच्या वृक्षसावलीत विसावलेल्या बुद्धांनी पलीकडच्या शेतातलं ते दृश्य पाहिलं. त्यांच्या मनी आलं, 'जेवून घ्यावं. भुकेची वेळ झालीच आहे. भूक लागलीच आहे.'

बुद्धदेव रस्ता ओलांडून पलीकडं भारद्वाजाच्या शेतात गेले. भिक्षेसाठी उभे राहिले. बुद्ध रोजच भिक्षा मागून पोट भरीत असत. दुपारी जेवणाची वेळ झाली म्हणजे जिथं कुठं असतील तिथं ते पाच घरी भिक्षा मागत असत. उदरनिर्वाह चालवीत असत.

समर्थ रामदासांनी भिक्षेलाही धर्म म्हटलं आहे. त्यांच्या रामदासी पंथातही असाच नियम होता. 'एका गावात एकच दिवस राहावे नि त्या ठिकाणी पाचच घरी भिक्षा मागून जेवावे.' - त्यांनी म्हटलं आहे :

ब्राह्मणाची दीक्षा। मागितली पाहिजे भिक्षा।।

ओम्भवतीच्या पक्षा। रक्षिले पाहिजे।।

बुद्धांचा निर्वाह, विचार-आचारही असाच!

बुद्ध भारद्वाजापुढं जाऊन उभे राहिले. भारद्वाज वाढण्याच्या, जेवू घालण्याच्या कामात त्यानं बराच वेळ बुद्धांकडं लक्षच दिलं नाही. बुद्ध अत्यंत शांत चित्ताने उभेच राहिले,... विलंब किंवा उपेक्षा - कशाबद्दलच किंचितसाही चित्तात क्षोभ नाही. क्रोध नाही. बुद्ध शांत शांत उभेच!

मग थोड्या वेळानं भारद्वाजानं बुद्धानं विचारलं, ''अरे, असा किती वेळ उभा राहणार आहेस, बाबा?''

बुद्ध म्हणाले, ''भिक्षा मिळेपर्यंत.''

भारद्वाजानं बुद्धांना तळपायापासून मस्तकापर्यंत काहीशा त्राग्यानंच न्याहाळून घेतलं. खडसावून म्हणाला,



ज्वाला जशा उसळती वर जावयाते। ध्येये तशीच अमुची असू देत माते।

''अरे भिक्षा मागतोसच का? धडधाकट दिसतो आहेस चांगला. माझ्यासारखे कष्ट कर. नांगर धर, खुरपणी कर, पेरणी कर, पिकं घे, घाम गाळ, कष्टाचं खा ! कोण आहेस तू?''

बुद्धांनी परम शांतीनं ओठावर हसू खेळवीत सांगितलं, ''मीसुद्धा शेतकरीच आहे.''

''शेतकरी?''

''होय. शेतकरीच!''

''कुठायत तुझे बैल?''

''उदंड उत्साह म्हणजे माझे बैलच ! संयम आणि विवेक हा कासरा !''

भारद्वाजाला या उत्तराची गंमत वाटली त्यानं विचारलं, ''कुठाय तुझा नांगर?''

बुद्धांनी सांगितले, ''माझा नांगर म्हणजे प्रज्ञा आणि या नांगराचा फाळ म्हणजे जागृती!''

भारद्वाजाला त्या बोलण्याची आणखी गंमत वाटली. पण गंमतीला गांभीर्याचा पदरही असल्याची जाणीव झाली!

''खुरपणी करतोस की नाही?''

''करतो तर ! ती तर वेळच्या वेळी केलीच पाहिजे. करावीच लागते.''

''मग कशानं खुरपणी करतोस? तुझं खुरपं कुठाय?''

''सत्याच्या मदतीनं मी असत्याचं तण खुरपून टाकतो.'' बुद्धांनी सांगितलं.

भारद्वाज गंभीर बनला. गंमत गेली, जाग आली. अंधार वितळू लागला, प्रकाश येऊ लागला. अज्ञान मावळू लागलं, जिज्ञासेची कळी उमलू लागली.

भारद्वाजानं विचारलं, ''भन्ते, आपलं क्षेत्र-शेत कोणतं? कुठं आहे?'

बुद्धांनी सांगितलं, ''लोकांची मनोभूमी हेच माझं क्षेत्र. या क्षेत्रातच मी तपश्चर्येची मेहनत करतो.''

''आणि मग, भन्ते ! कशाची पेरणी करीत असता आपण?''

''श्रद्धा, सद्भावना, सद्धर्म, सद्विचार, चारित्र्य याचं बीज मी पेरीत असतो.''

''आपण विश्रांती केव्हा घेता, भन्ते?''

''कर्मसंतोष हीच माझी विश्रांती !''

''आणि भन्ते, आपली गाडी कशी, कुठं जात असते?''

''शोक करण्याची किंवा दु:खी होण्याची जिथं पाळीच येत नाही, तिकडं माझी गाडी धावत असते.''

भारद्वाज चकित झाला! डोळे उघडले! पाहिले – उजेडच उजेड ! उजेडी राहिला उजेड भरून ... !

भारद्वाज नतमस्तकालीन झाला!

बुद्धदेवांचा भिख्खू बनला!

धन्य धन्य झाला!

* * *

झटपट गणित

अमोल करमरकर, ज्ञा.प्र.प्र.इ.१० वी

मोठ्या संख्यांच्या गुणाकाराची पद्धत!

प्रथम दोन संख्यांपैकी एक संख्या आडवी व एक संख्या उभी लिहून (ही संख्या खालून वर लिहावी) त्याच्या आतमध्ये चौरस काढून घ्या. (आकृतीत दाखविल्याप्रमाणे)

उदा. ९४२६ × ५९८७

दोन्ही चार आकडी संख्या असल्याने एकूण १६ चौरस घरे आतमध्ये तयार होतील. या प्रत्येक घरात तिरक्या रेषांनी छेदून त्याचे प्रत्येकी दोन भाग (आकृतीत दाखविल्याप्रमाणे) करावे. आडव्या व उभ्या संख्यांमधील आकड्यांचा गुणाकार करून तो त्या घरांमध्ये लिहा.

उदा. ९ × ७ = ९ × ८ =

९ × ९ = ९ × ५ =

४, २ व ६ च्या ही बाबतीत असेच करून संबंधित घरांमध्ये योग्य आकडे भरा. एका रेषेतील तिरक्या घरांमधील आकड्यांची बेरीज करा. प्रारंभ सर्वात उजव्या कोपऱ्यातल्या एकच तिरपे घर असलेल्या

	९	४	५	६	
७	३ / ६	८ / २	४ / १	२ / ४	
८	२ / ७				
९	१ / ८				
५	५ / ४				

आकड्यापासून (येथे २ पासून) करावा. नंतर त्यापुढील तिरक्या घरांमधील आकड्यांची बेरीज करा. हातचा आल्यास पुढील बेरजेत मिळवा.

आपल्या उदाहरणामध्ये प्रथम २ येईल. नंतर ठळक छपाईतील ४+४+८ = १६ म्हणून ६ लिहून १ हातचा पुढे घेतला. नंतर साध्या छपाईतील ८+१+६+४+४+१ (हातचा) = २४ म्हणून ४ बाहेरचे चौकटीत लिहून हातचे २ घेतले. याप्रमाणे पुढच्या बेरजा करत गेल्यास आकृतीत दाखविल्याप्रमाणे आकडे मिळतील.

	९	४	२	६	
७	३ / ६	८ / २	४ / १	२ / ४	२
८	२ / ७	२ / ३	६ / १	८ / ४	६
९	१ / ८	६ / ३	८ / १	६ / १	४
५	५ / ४	० / २	१ / १	१ / १	३
	५	६	४	३	

प्रत्यक्ष उत्तर लिहिताना डावीकडच्या आकड्यापासून सुरुवात करत उजवीकडच्या वरच्या कोपऱ्यातील आकड्यापर्यंत सरळ एकापुढे एक अंक लिहीत जा. जी संख्या मिळेल ते त्या दोन संख्यांच्या गुणाकाराचे उत्तर होय. या गणितात हे उत्तर **५६४३३४६२** असे येते. प्रारंभी रीत पक्की लक्षात येईपर्यंत वेळ लागेल. पण नंतर मात्र मोठमोठे गुणाकार तुम्ही अगदी झटपट करू शकाल.

* * *

दुर्दम्य

सुषमा निसळ

इतिहास हा तसा काहीसा कंटाळवाणा विषय पण ऐतिहासिक कथा, नाटके, कादंबऱ्या सर्वांनाच आवडतात. माधवराव पेशवे यांच्या जीवनावरची 'स्वामी' ही कादंबरी, 'रायगडला जेव्हा जाग येते' हे शिवरायांच्या व संभाजी महाराजांच्या नात्याचे दर्शन घडविणारे नाटक मराठी रसिकांनी डोक्यावर घेतले. इतिहासातील थोर व्यक्तींबद्दल सर्वांच्याच मनात आदराची, कृतज्ञतेची भावना असते. श्रेष्ठ साहित्यकृतींमधून ही भावना अधिकच वाढीस लागते. 'दुर्दम्य' ही लो. टिळकांच्या जीवनावरची अशीच एक चरित्रात्मक प्रदीर्घ कादंबरी आहे. लोकमान्यांबद्दल भारतीय जनतेच्या मनात नितांत आदराचीच भावना आहे. पण काही विचारवंतांनी टिळक हे प्रतिगामी होते असा प्रचार करायला सुरुवात केली तेव्हा श्री. गंगाधर गाडगीळ यांनी या चरित्रात्मक कादंबरीद्वारे लोकमान्यांचे जीवन यथायोग्य रीतीने समाजापुढे ठेवण्याचा प्रयत्न करायचे ठरविले व त्यात त्यांना पुरेसे यशही मिळालेले दिसते.

लोकमान्यांच्या महाविद्यालयीन जीवनापासून या कादंबरीची सुरुवात झालेली आहे. गणितासारख्या अवघड विषयातील त्यांची असामान्य बुद्धिमत्ता, आपला विषय ठामपणे लोकांपुढे मांडण्याचा वकिली बाणा, वेदांचा गाढा अभ्यास असे बुद्धिमत्तेचे कितीतरी पैलू छोट्या-मोठ्या प्रसंगातून आपल्यापुढे येतात. पारतंत्र्यातील मृतवत् समाजामध्ये जागृती आणण्यासाठी त्यांनी आखलेल्या योजना, ब्रिटिश राजसत्तेपुढे टक्कर घेण्याची अंगातली तडफ हा सर्व भाग वाचनीय आहे.

इतिहासाचा शालेय पातळीवर अभ्यास करताना लो. टिळकांनी शिवजयंती, गणेशोत्सव सुरू केले. शिक्षणसंस्था सुरू केल्या एवढाच तपशील आपल्या वाचनात



येतो. पण हे सर्व करीत असताना त्यासाठी आवश्यक असणारे लोकमान्यांचे संघटनकौशल्य, योजनाचातुर्य, अर्थसंकलन यासर्व पडद्यांमागच्या महत्त्वाच्या हालचाली प्रस्तुत कादंबरीच्या वाचनातून आपल्याला समजू शकतात.

मोठ्या नेत्यांची झेप ही कधीच मर्यादित क्षेत्रापुरती नसते. त्यांची स्वप्नेही नेहमीच भव्यदिव्य असतात. मनूच्या कमंडलूतील माशासारखेच त्यांच्या कर्तृत्वाचे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तार पावत असते. पुण्याच्या महाविद्यालयात शिकत असताना सुरू केलेले भारताच्या स्वातंत्र्याचे कार्य लोकमान्यांनी चार पाऊले पुढे जाऊन भारतभर पसरविले. हे कार्य करीत असताना आपले प्रत्येक पाऊल योजनापूर्वक टाकण्याचा धोरणीपणा, द्रष्टेपणा वाचून आपण अवाक होतो. जाणीवपूर्वक मांडलेल्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या या यज्ञात वैयक्तिक भावभावना, कौटुंबिक सुख यांच्या समिधा कायमच पडत होत्या.

कोणतेही मोठे कार्य हाती घेतलेल्या व्यक्तीला सहकारी मिळत जातात, त्यांचे अनुयायी होतात. त्यांच्या साहाय्यानेच कार्याला गती मिळत असते. पण त्याचबरोबर दुसरीही बाजू येते. प्रतिस्पर्धी असतात, अडथळे निर्माण होतात, लोकमान्यांनाही या दिव्यातून जावे लागत होते. त्यात महत्त्वाची गोष्ट एवढीच होती की सर्वांचे स्वातंत्र्य प्राप्तीचे ध्येय समान होते, मतभेद, हेवेदावे हे वैयक्तिक पातळीवर राहात असत. स्वातंत्र्यप्राप्तीचा ध्यास सर्वच नेत्यांना लागलेला होता. याच ध्येयासाठी लोकमान्यांनी आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी वर्तमानपत्र चालविले; शिक्षणसंस्था उभारल्या, सार्वजनिक उत्सव सुरू केले. जनांचा प्रवाह पुढे घेऊन जाण्याची प्रचंड, अफाट क्षमता टिळकांच्या ठायी होती. हे त्यांचे गुणविशेष कादंबरी वाचताना जाणवतात.

देशाच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्नपूर्वक बलदंड केलेले त्यांचे शरीर अखेर त्याच कार्यासाठी थकत, झिजत गेले. प्रदीर्घ तुरुंगवासामुळे आजारपणात सतत भरच पडत गेली आणि अखेर स्वातंत्र्यासाठी समाजामध्ये जागृती निर्माण करून हे दिव्य जीवन अस्ताला गेले. हा सर्व भाग तुम्ही मुलांनी मुळातून अवश्य वाचावा आणि आपण स्वातंत्र्याचे सुख कोणत्या किंमतीवर उपभोगीत आहोत याचा अंतर्मुख होऊन विचार करावा, तीच लोकमान्यांना खरी श्रद्धांजली ठरेल!

दुर्दम्य	–	चरित्रात्मक कादंबरी
लेखक	–	गंगाधर गाडगीळ
पृष्ठसंख्या	–	५५४
किंमत	–	रु. २००/-
प्रकाशक	–	सुपर्ण प्रकाशन, पुणे.

* * *

नकोत नसली जरी प्रकट स्मारकांची दळे। असंख्य हृदयी उभी असत आपुली देवळे।

सुंदर आणि सुकर
शुभेच्छा पत्रे !

– उर्मिला मुनशी

करून तर पाहा

''राऽऽजू, राऽऽजू, अगं, आई बघ, नितीन तयार पण होऊन आला. अजून ताईनं भेटकार्ड आणलं नाही? सगळी मुलं जमली पण असतील?'', ''अरे मग पैसे पाकिटात घालतोस का?'' ''छे, छे, पैसे नको.''

''बरं नितीनला वर तरी बोलव.'' त्याची मदत घेऊन मी तुला सुंदर व सोपे असे भेटकार्ड करून देते. तोपर्यंत तू तयार हो, समजलं?''

''आपल्या घरात असलेल्या वस्तूतूनच आपल्याला भेटकार्ड करायचे आहे. अरे नितीन मला जरा मदत करशील का? ''जरूर जरूर !''

साहित्य : कार्डशीट, रंग, रांगोळी (रंगीत), ब्रश शून्य नंबरचा, टुथब्रश (वापरलेला), जुन्या मासिकातील रंगीत कागद, डाळ, तांदूळ.

यातून आपण ३-४ प्रकारांनी शुभेच्छापत्रे करू बरं का.

पहिल्या प्रकारात जुन्या इंग्रजी मासिकातील गुळगुळीत रंगीत कागदाचा भाग डिंक अगर फेव्हिकॉल वापरून आपण भेटकार्ड तयार करू. रंगीत कागदाचा आपल्याला हवा असलेला आकार कापून घ्यावा. डिंक अगर फेव्हिकॉल वापरून कार्डशिटवर तो डिझाईनवर चिकटवावा. उदा. झाड, घर, पक्षी, झाडाचा बुंधा व खोड ब्राऊन रंगाच्या कागदातून घ्यावे. पानांचा भाग हिरव्या रंगातून घ्यावे. थोडेसे शेडींग वापरून



झाडाचा परिणाम चांगला साधता येतो. तसे घरही करता येते. अगदी कमी श्रमात कमी वेळात व अल्प खर्चात आकर्षक असे कार्ड तयार होईल. प्रयत्न जरूर करून पाहा.

दुसऱ्या प्रकारामध्ये आपण फक्त रांगोळी वापरणार आहोत. कार्डशीट साधारण पोस्टकार्ड आकाराचे कापावे व आपल्याला हवा असलेला आकार त्यावर



पेन्सिलीने फिकट काढावा. नंतर शून्य नंबरच्या ब्रशने पातळ डिंक एक सारख्या उंचीत लावावा. कमी जास्त थरात लावला गेल्यास रांगोळी बारीक जाड होण्याची शक्यता असते म्हणून डिंक ब्रशने लावल्यावर वरून कागद हलक्या हाताने फिरवावा. रांगोळी चिमटीने टाकावी आणि लगेच झटकावी. म्हणजे जास्तीची रांगोळी निघून येते. १-१ भाग घेत आपण आखलेला आकार पूर्ण करायचा - उदा. फूल, पान असेल तर प्रथम फुलाच्या पाकळ्या घ्याव्या. त्यानंतर परागाचा भाग घ्यावा. फूल पूर्ण झाल्यावर पान व दांडीचा भाग घ्यावा. हे कार्ड सुद्धा झटपट व कमी खर्चात होते. तुम्ही तर हे अगदी छान करू शकाल.

भेटकार्ड बनविण्याचा आणखी एक प्रकार आहे.

डाळ व तांदूळ, रंग व जुना टुथब्रश ह्यांच्या साहाय्याने आपल्याला भेटकार्ड तयार करायचे आहे. इथे मात्र डिंक वा फेव्हिकॉल वापरायचे नाही. सावधगिरी मात्र भरपूर हवी, थोडा सुद्धा हलगर्जीपणा आपला दुप्पट वेळ घेऊ शकतो.

कार्डशिट एका ठिकाणी नीट पक्के ठेवा. ते हलणार नाही याची काळजी घ्या. तांदूळ एक सारख्या आकाराचा घ्यायचा.



तो उभ्या दिशेने ठेवायचा. उदा. झाड बनवायचे असेल तर बुंधा व झाडाच्या फांद्या ह्या तांदूळ वापरून करायचा. जमिनीचा आकार हा तांदूळ रचूनच करायचा. पानांचा व फुलांचा आकार तुरीचा डाळ वापरून करायचा. पानांच्या जागी डाळ ठेवायची दाणा अगदी जवळ जवळ चिकटवायचे. हे काम अगदी हळुवार व्हायला हवे. हलता कामा नये.

एकदा डिझाईन स्थिर झाले की, आपल्याला रंग वापरता येईल. आपल्याला जो एकच रंग वापरायचा आहे तो बशीत घ्या. थोडेसे पाणी मिसळा. टुथब्रशने रंग व पाणी नीट एकसारखे मिसळा. ब्रशमधील रंग थोडा कमी (झटकून) करा. नंतर ब्रश हातात धरून अंगठ्याच्या साहाय्याने रंग उडवायचा. ब्रश कार्डशिटपासून जरा उंच धरून रंग उडवायचा. बारीक तुषार कार्डवर पडतील पूर्ण शिट अशा तुषारांनी भरून काढायचे व नंतर ५ मिनिटे तसेच थांबून रंग जमू लागतो. त्यानंतर कार्ड उचलून झटकून घ्यावे. तांदूळ, डाळ काढून घ्या. सुंदर डिझाईन उमटलेले दिसेल.

याच प्रकाराने डाळ, तांदूळ न वापरता झाडाची पाने वगैरे ठेवूनही रंग उडवावा. सुरेख कार्ड तयार होईल.

तसाच आणखी प्रकार सांगते. वेलवेट पेपर वापरूनही आपण अतिशय आकर्षक कार्ड तयार करू शकतो. सांगा बघू तुम्ही चित्रकार नाही म्हणून इथं काही अडलंय का? फक्त तुमची कल्पनाशक्ती तेवढी वापरायची. तुम्ही वाटेल ते बनवू शकाल.

राजू तयार होऊन येईतो आमची चार भेटकार्ड तयार झाली बरं का!

* * *

अजून चालतोचि वाट–
माळ हा सरेना !

शैलजा देशमुख

नुकताच पाऊस उघडला होता. संध्याकाळी कंटाळा आला म्हणून विनय जरा पाय मोकळे करायला म्हणून बाहेर पडला. चालता चालता तंद्रीमध्ये त्याच्या घराजवळ एक मोठा माळ होता, तेथे तो पोहोचला. काही दिवसांपूर्वी तो इकडे फिरायला आला होता तेव्हा कसं सारं शांत होतं. आज काही वेगळीच चाहूल लागत होती.

बकऱ्यांच्या बें...बें... आवाजाने त्याचं लक्ष वेधलं गेलं. धनगरांची १०–१५ पालं तिथं पडली होती. छोटे तंबू – पालं. समोर पाण्यानं भरलेला एखादाच चकचकीत हंडा. सगळीकडे चुली पेटलेल्या ... दूरवर कुठेतरी त्यांची घोडी चरत होती. छोटी–छोटी बकरीची पिल्लं प्रत्येक पालाजवळ दोरीनं बांधली होती. सगळी कशी शहाण्यासारखी एका रांगेत बसली होती.

विनय कुतूहलानं पाहायला लागला. ४–५ वर्षांची छोटी छोटी मुलं – काही म्हातारी माणसं आणि स्त्रिया – पालाच्या दारात विसावलेली कुत्री. सगळं कसं चित्रातल्यासारखं दिसत होतं. धनगरांच्या डोक्यावरची रंगीत मुंडाशी या चित्रात रंग भरत होती. डोक्यावर पदर घेतलेल्या स्त्रिया कामात मग्न होत्या. हा जथा नुकताच तिथं आला असावा. झाडाच्या डहाळ्यांची केरसुणी करून कुणी पालाभोवतालची जागा आत्मीयतेने झाडत होतं – तर कुणी भांड्यांची मांडामांड करून भाकरी थापण्याच्या तयारीत! डोक्याच्या आडव्या टोप्या – अंगात सारख्याच प्रकारचे मळके, फाटके कुडते घातलेली छोटी मुलं तर रंगीबेरंगी परकर पोलकं घातलेल्या छोट्या मुली यांचा मुक्त खेळ चालू होता. एक छोटंसं वर्ष – दोन वर्षाचं उघडंवाघडं पोर हातात छोटी काठी घेऊन कोंबडीच्या पिलामागं धावत होतं.

दोन छोट्या मुली थाळीत भाकरी आणि पाण्याचा तांब्या घेऊन इकडेतिकडे हिंडत जेवत होत्या. विनयला आपले लहानपणाचे दिवस आठवले. या वयाचा असताना काय त्याचा थाट असायचा! हा घास काऊचा, हा चिऊचा.. करीत हातात दूधभाताची ताटली घेऊन आई मागे धावायची. आकाशातला चांदा मामा बनून लिंबोणीच्या झाडाआड दडायचा. सुंदर गोष्टींच्या पुस्तकातून वाघ, सिंह, हरीण त्याच्याशी खेळायला यायचे, शाळेत जाताना छान छान

जेव्हा वेदनांचे नाते जुळते तेव्हा माणसामधल्या तटाच्या भिंती ढासळून पडतात.

कपडे, पुस्तकं, खाऊ... आई - बाबा, आजी - आजोबा सगळ्यांच्या कौतुकाच्या नजरा त्याला जपत असायच्या.

आणि आता ही समोरची ४-५ वर्षांची छोटी छोटी मुलं - आपल्याच हातानं कोरडी भाकरी पाण्याबरोबर खाताना दिसत होती. ना त्यांच्या आयांचं त्यांच्याकडे लक्ष होतं ना आजोबांचं! रात्र होण्यापूर्वी जेवण उरकून अंधार पडल्यावर गुडूप व्हायचं हा त्यांचा दिनक्रम असावा.

देशाला स्वातंत्र्य मिळालं- विज्ञानाने सुधारणा घडवून आणल्या, खेडी सुधारली- पण इथे ही छोटी मुलं आज या गावी तर उद्या दुसऱ्या गावी - यांच्या शाळेचं काय...? शिक्षणाचं काय? अशीच ही कष्ट करीत, खेळत मोठी होणार ... उद्या मेंढरांमागं जाणार. एका पिढीमागून दुसरी पिढी ... दुसरीमागे तिसरी. अशा किती जमाती असतील? सरकारने दिलेल्या सवलती त्यांना माहीत तरी असतील की नाही कोण जाणे!

...उघडा माळ! घोड्याच्या पाठीवर राहील इतकंच संसाराचं सामान .... दारासमोर पाण्याचा एकच हंडा भरलेला. त्यातच भांडी धुवायची; हात धुवायचे हे पाणी तरी यांनी कुठून आणलं असेल? विनयला आपल्या घरातील जागोजागी असणारे नळ आठवले. टी.व्ही. .... रेडिओ ... गाद्यागिरद्या आठवल्या. शाळेच्या सहलीला रायगडावर गेल्यावर तिथे चांदण्या रात्री उघड्यावर झोपताना तो आणि त्याचे मित्र किती खुश झाले होते! आता मात्र विनयच्या डोक्यात वेगळेच विचार घुमत होते. रोज असं उघड्यावर झोपताना यांचे किती हाल होत असतील? पानावर बसल्यावर आवडीची भाजी नाही म्हणून आपण नाक मुरडतो, याची त्याला विलक्षण लाज वाटायला लागली.

विज्ञानकथा वाचताना प्रगत परग्रहावरची माणसं, त्यांचं आयुष्य ... विचार अनुभवताना त्याला खूप आवडायचं. त्याच्या मनात आलं आज आपण एकाच ठिकाणी, एका काळात आहोत. पण आपण जणू दोन ग्रहांवरचं जिणं जगतं आहोत. ही समोरची माणसं कुठेतरी पुराणकाळाशी नातं सांगणारं जीवन जगतायंत. त्यांना चिंता आहे फक्त अन्न, वस्त्र, निवाऱ्याची आणि आपण म्हणजे त्यांच्या दृष्टीने अतिप्रगत जगातलीच माणसं----

बघता बघता सूर्यास्ताची वेळ झाली. अचानक समोरच्या पालांतून जाग दिसायला लागली. दूरवरून चारी बाजूने मेंढ्यांचे कळप घेऊन मेंढपाळ पालावर परतू लागले. बांधून ठेवलेली छोटी छोटी पिल्लं आपापल्या आयांना भेटायला उत्सुक होऊन अधिकच बें... बें करू लागली. मेंढ्या परतताच छोट्या पिलांना सोडण्यात आलं त्यावेळी त्या पिल्लांची आपली आई शोधण्याची व आईची आपलं पिलू शोधण्याची लगबग बघताना विनय चक्रावून गेला. शेकडो बकऱ्यांच्या कळपातून पाच मिनिटांच्या आत जे ते पिलू आपल्या आईजवळ जाऊन दूध पिऊ लागलं. दोन-तीन पिलांना आपली आई

मिळत नव्हती ती कावरीबावरी झाली. शेवटी त्यांच्या मालकांनी त्यांना त्यांच्या आईजवळ नेऊन सोडलं. अनिमिष नेत्रांनी विनय ते दृष्य पाहात होता. आता झोपडीझोपडीत छोटी मुलं आपल्या आईबाबांबरोबर भाकरी खाण्यासाठी बसली. – माळावर मध्यभागी सगळ्या मेंढ्या निवांत उभ्या होत्या...त्याक्षणी विनयला आठवलं लहानपणी शाळा सुटल्यावर कधी कधी आई त्याला न्यायला यायची...गणवेश घातलेली हजारो मुलं गेटमधून बाहेर पडायची...बऱ्याच जणांच्या आया दाराकडे टक लावून आपल्या पाल्याची वाट पाहात असायच्या. कसं कोण जाणे पण सारखे गणवेश घातलेल्या सारख्या वयाच्या त्या मुलांमधून त्याची आई दुरून त्याला ओळखायची. हळूच हसून खुणेसाठी हात वर करायची.

ती मुकी मेंढरं, मेंढपाळाची छोटी मुलं...आणि स्वत: तो यांना जवळ आणणाऱ्या मातृत्वाच्या त्या दर्शनाने विनय चकीत झाला. घरी आई वाट बघत असेल या जाणीवेने त्याची पावलं लगबगीने घराकडे वळली. नुकतंच त्यानं व्यंकटेश माडगुळकरांचं 'बनगरवाडी' वाचलं होतं. त्याच्या मनात आलं– 'बनगरवाडी'तल्या धनगरांना त्यांचं गाव होतं– गावाला शहाणं करायला झटणारे स्वप्नाळू मास्तर होते. पण अशा जागोजाग भटकणाऱ्या लोकांचं काय? – स्वत:चं गाव दूर कुठेतरी ठेवून – पोटासाठी जगायला निघालेली ही माणसं. त्यांच्या नशिबातली ही भटकंती कधी संपणार? 'अजून चालतोचि वाट – माळ हा सरेना' या कवितेचा शब्दश: अर्थ ही माणसं जगतायत. यांचं जीवन कधी सुधारणार? यांना आकाशातला चंद्र खुणावत नाही तर 'भाकरीचा चंद्र'च त्यांचे दिवसरात्र ठरवतो! भोवताली विजेचा झगमगाट तर यांच्या घरात एकच तेवणारा काजळलेला दिवा! मोकळ्या माळावर बकऱ्यांमागे धावणं हीच यांची शाळा!

अशी किती छोटी मुलं दैनंदिन गरजा भागवणाऱ्या वस्तूंपासून वंचित असतील? शाळा तर दूरच राहिली.

हे सर्व अनुभवताना विनय कणाकणानं मोठा होत होता. आजपर्यंत असे विचार कधीच त्याच्या मनात आले नव्हते. काळोखातून घरी परतताना 'देशस्थितीचा' अभ्यास करण्यासाठी भटकंती करणारे म.गांधी, विवेकानंद त्याला आठवत होते. 'मी कोण होणार?' हा निबंध लिहिताना इंजिनिअर, डॉक्टर ही स्वप्नं तो पाहात होता. पण आज मात्र आपण भविष्यात काय करणार आहोत हे जरी त्याच्या बालबुद्धीला ठामपणे सांगता येत नसलं तरी एक विचारांची नवीनच दिशा त्याला दिसत होती. करण्यासारखं खूप आहे या भावनेने गंभीरपणाबरोबरच अदम्य उत्साह त्याच्यात सळसळत होता.

* * *

माझे आजोबा

तृप्ती थेटे, ज्ञा.प्र.प्र.पुणे

त्या दिवशी इंग्रजीची कविता घोकत असताना माझं लक्ष सारखं इकडून तिकडे जात होतं. पण सारखं इकडून तिकडे जाणारं माझं लक्ष मात्र पुस्तकात, हो हो अगदी समोर धरलेल्या– मात्र जात नव्हतं. तेवढ्यात फोन खणाणला. ताईचं फोनवर हसणं, खिदळणं सुरू झालं. ताईची चेष्टा करायची म्हणून मी तिच्या शेजारी बसून कविता जोरजोरात घोकू लागले. ताईला तिकडचे ऐकू येत नसल्याने ती माझ्यावर खेकसली आणि दुसऱ्याच मिनिटाला तिच्या जोरदार हाकेमुळे आई समोर येऊन उभी राहिली. दोघींनी मिळून माझी छान कानउघाडणी केली. मी पुटपुटत आत जाऊन बसले आणि विचार करू लागले की आई–ताई माझ्याशी अशा वागतातच का? माझे आजोबा आत्ता असते तर ते कधी मला रागावलेच नसते! आणि माझं लक्ष समोरच्या काळ्या चौकटीमागच्या काचेतल्या पुसटशा आजोबांकडे गेलं.

लहानपणीच्या बारीकसारीक आठवणी आठवल्या. ताईच्या दप्तरात झुरळ सोडताना मदत करणारे, झोक्यावर बसवून जोरात झोका देणारे, आई रागावली तर आमची कड घेणारे, आंबे पळवल्यावर त्यावेळेस रागावणारे आणि लपून सुपारी खाणारे आजोबा चटकन आठवले. हात मागे बांधून शतपावली करतानाचे आजोबा मला खूप आवडायचे. लहानपणी ताईच्या दप्तरात झुरळ सोडून कपाटामागे दडल्यानंतर येणारं हसू दाबत उभे असताना आम्ही त्यांच्या त्या ७० वर्षांच्या चार डोळ्यांकडून कधी हुडकले गेलो नाही, असा प्रसंग तरी मला आठवत नाही. दंडाला धरून ते आम्हाला बाहेर काढत आणि रागावण्याऐवजी म्हणत ''गुंडांनो शान्त रहा, ताईला कळलं तर ती रागवेल हं !''

माझ्या आईचं नाव, 'नन्दिनी' त्यांना खूप आवडायचं. तिला नन्दू म्हटलेलं त्यांना आवडायचं नाही. आजीनं आईला जर कधी नन्दू अशी हाक मारली की ते म्हणत, ''अगं सुलभा, भरतेश्वराचं भऱ्या करतेस, तेवढं पुरे पण या नन्दिनीचं नन्दू करू नकोस. मला हे नाव आवडतं म्हणूनच तर भऱ्याच्या लग्नात भऱ्याला मी हिचं नाव बदलू दिलं नव्हतं! जर हे नाव मला आधी माहीत असतं तर आपल्या लग्नात मी तुझं हेच नाव ठेवलं असतं !'' यावर नेहमी आजी गालातच हसून आत निघून जायची. बाबांना यायला थोडा उशीर झाला की आजोबा चिडलेल्या वाघासारख्या येरझाऱ्या घालीत आणि आम्ही आमच्या आजोबांना शांत करायचा प्रयत्न करीत असू.

गणपतीच्या दिवसात खांद्यावर बसवून गणपती दाखविणारे, दिवाळीत फटाके फोडणारे आजोबा आमचे सगळ्यांचे लाडके होते. हिवाळ्यात त्यांच्या कुशीतली ऊब

सगळ्यांनाच हवीहवीशी वाटायची आणि त्यासाठी आमची होणारी भांडणं पाहून ते खूप हसायचे आणि मग सगळ्यांनाच जवळ ओढून गोष्ट सांगायचे. सकाळी उठून दीड तासाची पूजा आटोपून पेपर वाचण्यात ते दंग होऊन जात. दुपारी झोपल्यावर त्यांच्या वर-खाली होणाऱ्या पोटाकडे पाहून आम्हांला येणारं ते मनमोकळं हसू आठवल्याखेरीज राहवत नाही.

आमचे त्यांच्याबरोबरचे असे किती गोड दिवस सांगू, पण एकदा आमच्याबरोबर पावसात भिजल्यामुळे ते आजारी पडले आणि दिवसेंदिवस आजारीच पडत गेले. तेव्हाची एक कविता मला आठवते ....

आजोबा एक दिवस गाढ झोपी गेले.
आम्ही त्यांना जागवण्यासाठी खूप काही केले
आजोबा मात्र हलले नाहीत, बोललेही नाहीत
''गुंडांनो शान्त रहा !''
म्हणून ओरडलेही नाहीत.

क्षणभरी गार स्पर्श होऊन ऊब आठवली त्यांची पण ती ऊब मात्र हरवली होती कुठेतरी! आजोबांना झाले काय म्हणून आम्ही घाबरलो.

धावत जाऊन घरच्यांना याबाबत बोललो.

''आजोबा देवाघरी गेले'' कुणी मग असं म्हणाले.

आम्हा ते मुकेपण त्यावेळी उमजले. आजोबा असे न सांगता कधी कुठे जात नसत, आम्हाला गोष्ट न सांगता कधीही ते झोपत नसत, भिंतीवरच्या फोटोत आता आजोबा नुसते हसत असतात, कुणीच सांगत नाही तरी सारे गुंड शान्त राहतात.

''सातपुड्याचे चोर तुम्ही, रान-चिमण्यांनो जाल उडून'' शब्द आठवून तुमचे आजोबा, कण्ठ आज येतो दाटून, कण्ठ आज येतो दाटून, कण्ठ आज येतो दाटून!

लहानपणीचे आजोबांसारखे नातेवाईक आता हरवल्यासारखे झाले आहेत, म्हणून तशा अनुभवांसाठी, दिवसांसाठी मला बालपणात नक्की जायला आवडेल आणि आजोबा-आजोबा अशा हाकांमध्ये गुंगून जायलाही खूपच आवडेल.

* * *

आव्हान

नव्या क्षितिजावर उमलली नवी आव्हाने
भानु खुणावतसे मज नव तेज किरणाने।
नवी आव्हाने अन् नव्या अनेक वाटा,
मनात उसळल्या उत्साहाच्या लाटा।
तोच सूर्य अन् तीच झाडी,
त्याच वाळूवरती लाट घेई उडी।
मन प्रफुल्ल होई पाहून हे गोचर,
त्याच वेळी मनात येती अनेक विचार।
सागराच्या वर उंच गगनात,
झेप घेण्या पंख माझे आतुरले,
पण अचानक मन माझे घाबरले
काय होईल जर;
माझे आव्हानच अस्ताला गेले?

सुकांती मुळे, ८ वी ज्ञा.प्र.प्र. पुणे

दळणाचे यंत्र

प्रेरणा कापसे, इ. ८ वी

विज्ञान उपकरण

मित्रांनो, घरी दळणाचे, कुटण्याचे काही ना काही काम असतेच. त्यासाठी आपल्याकडे मिक्सर, ग्राइंडर सारख्या वस्तूही असतात. परंतु तुम्ही घरीच दळणाचे यंत्र बनवले तर काही तरी उपयुक्त वस्तू बनविल्याचा आनंद तुम्हाला नक्कीच मिळेल. येथे हे यंत्र कसे बनवायचे त्याची कृती दिली आहे.

साहित्य : ॲल्युमिनिअम पत्रा, भोके पाडण्यासाठी खिळा आणि हातोडी, मूठ (हॅन्डल) तयार करण्यासाठी लाकडी गोल, आणखी एक लाकडाचा गोल ठोकळा (हा ठोकळा ॲल्युमिनिअमच्या पत्र्यापेक्षा थोडा मोठा असावा.) जोडण्यासाठी बारीक चुका (खिळे) किंवा स्क्रू, खाली लाकडी फळी, लोखंडी अगर जाड पत्र्याच्या दोन पट्ट्या, आणखी थोडा पत्रा आणि ॲल्युमिनिअम गोल पत्र्याला आवरणासाठी साधा पत्रा.

कृती : प्रथम ॲल्युमिनिअमचा आयता-कृती पत्रा घेऊन त्याला खिळ्याने भोकं पाडून घ्या आणि त्याला गोल आकार द्या. भोकं पाडल्याने होणारा खडबडीत भाग वरच्या



बाजूला आला पाहिजे. त्यामुळे आपण त्यामध्ये घातलेले जिन्नस बारीक होऊ शकतील. याला दुसरा साधा पत्रा जोडून घ्यावा.

यानंतर मोठ्या गोल लाकडाच्या ठोकळ्याला मूठ बसवून घ्यावी. या मुठीला धरून चक्रासारखा ठोकळा फिरवता येईल. दोन जाड पत्र्याच्या पट्ट्यांच्या साहाय्याने हे सर्व एका लाकडी फळीला जोडा. ॲल्युमिनिअमच्या भोके पाडलेल्या पत्र्याच्यावर पत्र्याचा घन चौकोन तयार करून घ्या. त्यातून दळावयाचा पदार्थ घालता येईल. हा पदार्थ थेट भोके पाडलेल्या खडबडीत पत्र्यावर जाऊन पडेल. आता आपले यंत्र पूर्ण तयार झाले आहे. यंत्राच्या मुठीला धरून ते गोल फिरवले की, पदार्थ भोकं असलेल्या व साध्या पत्राच्या मध्ये येऊन तो भरडला जाऊन बारीक होईल.

* * *

'जरा डोके चालवा !' चे उत्तर

'छात्र प्रबोधन' च्या वर्ष ३, अंक १२ मध्ये तुम्हाला एक गणितातील कोडे दिले होते. पहिल्या दोन मिसाईलवरून संचातील तिसऱ्या मिसाईलचा लक्ष्य क्रमांक तुम्ही शोधून काढायचा होता. या कोड्याचे उत्तर अनुक्रमे १०, ४३ आणि १२ असे आहे. मिसाईलचे लक्ष्य क्रमांक अचूक शोधून काढणाऱ्या वाचक-प्रबोधकांची नावे पुढील प्रमाणे आहेत.

१. अमोल गणेशराव देशमुख, परभणी
२. हर्षल रमेश जकातदार, देवपूर-धुळे
३. हर्षद दत्तात्रेय पाटील, धुळे
४. अभिजित बसप्पा चाकोते, लातूर
५. विलास मधुकर मेस्त्री, तळवली
६. हर्षवर्धन मुकुंद डबीर
७. लीनम प्रकाश गवारे, नाशिक
८. मंगेश सुभाष दीक्षित, धुळे
९. अनघा शरद कुलकर्णी, भुसावळ
१०. स्मिता शंकर किरवे, सातारा

अजून अनेकांनी उत्तरे शोधली असील तर आम्हाला जरूर कळवा. अचूक उत्तर पाठविणाऱ्या प्रबोधकांचे मन:पूर्वक अभिनंदन!

पूर्वेकडचा स्वातंत्र्यसूर्य

अनघा लवळेकर

भारताचा स्वातंत्र्योत्तर इतिहास

देशाच्या अस्तित्वाचा एक महत्त्वपूर्ण आधार म्हणे त्याच्या भूमीची एकसंधता ! दुर्दैवाने भारतभूमीची एकसंधता भंगली !! एकाच देशाचे दोन तुकडे झाले आणि मग धर्माच्या आधारावर विभाजन झालेले राष्ट्र निर्माण झाले. पण ते तरी एकसंध राहिले का? वाचूया त्याचा इतिहास.

डिसेंबर १९७० ! साऱ्या पूर्व-पश्चिमेच्या देशांना बसलेल्या एका जबर धक्क्याचा दिवस! हा धक्का भूकंपाचा नव्हता किंवा ज्वालामुखीच्या उद्रेकाचाही नव्हता. पण तरीही सर्व जगातील मुत्सद्यांचे डोळे विस्फारले आणि 'आता काय घडणार' अशी उत्कंठा त्यांच्या मनात भरून राहिली.

काय होता हा धक्का? पूर्व आशियातील एका छोट्याशा भूमीच्या तुकड्यावर जी राजकीय उलथापालथ चालू होती त्याचा हा परिणाम होता. धर्माच्या आधारावर हिंदुस्थानासारख्या प्रचंड वृक्षाच्या डाव्या उजव्या बाजूंच्या फांद्या कापून जो दोन तुकड्यांचा पाकिस्तान निर्माण झाला होता त्याच्या एका तुकडचात राजकीय विस्फोटाची चाहूल लागली होती. त्याचे दृष्य रूप म्हणजे 'शेख मुजीबूर रहमान' यांच्या 'अवामी लीग' ह्या पक्षाला लोकसभेत मिळालेले सणसणीत बहुमत ....

पण हे कसं घडलं? या विस्फोटाची पाळंमुळं किती खोलवर गेलेली होती - भारताचा ह्या साऱ्या घटनांशी किती आणि कसा निकटचा संबंध होता हे जाणून घ्यायचं असेल तर इतिहासाची काही दशकं उलटून मागे जावं लागेल, ते थेट भारताच्या

स्वातंत्र्यदिनापर्यंत. भारताला स्वातंत्र्य मिळायच्या चोवीस तास आधी लाहोर आणि ढाक्का इथे स्वातंत्र्याची नौबत कडाडली होती. पण भारताच्या नव्हे - पाकिस्तानच्या ! धार्मिक बहुसंख्येच्या जोरावर पंजाब आणि बंगालची फाळणी झाली होती. 'आमार शोनार बंगाल' 'वंदे मातरम्' अशी गीते गात १९०५ मध्ये ज्यांनी बंगालच्या फाळणीचा प्रस्ताव निकरानं परतवून लावला त्यांच्याच नशिबात १९४७ चं रक्तलांच्छित विभाजन बघणं आलं.

पश्चिम पाकिस्तान – पंजाब आणि सिंध या प्रांतांचा लचका तोडून बनलं, तर पूर्व पाकिस्तान बंगालच्या अर्ध्या भूमीवर अस्तित्वात आलं. एकाच देशाचे दोन तुकडे एकमेकांपासून १२०० मैलांवर निर्माण झाले आणि त्यातच पुढील विस्फोटाची बीजं पेरली गेली.

देशाच्या अस्तित्वाचा एक महत्त्वपूर्ण आधार म्हणजे त्याच्या भूमीची एकसंधता ! पाकिस्तान निर्माण झाला धार्मिक मूलतत्ववादाच्या – धर्मांधतेच्या बळावर आणि इथेच पाक राज्यकर्त्यांच्या भविष्यात एक काळं पान लिहिलं गेलं. पश्चिम पाकिस्तान आणि पूर्व पाकिस्तानमध्ये केवळ मैलांचंच अंतर नव्हतं तर त्याचा पूर्ण पायाच निराळा होता. भाषा, वेष, परंपरा, सवयी सर्वच एकमेकांपासून कमालीचं वेगळं होतं. केवळ धर्म काय तो एक होता.

पश्चिम पाकिस्तान सत्तेचं केंद्र होतं. राज्यकर्त्यांचं घर होतं. तर पूर्व पाकिस्तान बनलं मजुरांचं घर. जणू ती पश्चिम पाकिस्तानची एखादी वसाहतच. आकारानं लहान पण जनसंख्या भरपूर. संपूर्ण पूर्व व पश्चिम पाकिस्तानच्या लोकसंख्येतील ५४% लोक–निम्म्याहून अधिक पूर्व पाकिस्तानात राहणारे होते. म्हणजेच राज्यकर्ते पश्चिम पाकिस्तानचे पण मतदार जास्त पूर्वेचे.

पूर्व पाकिस्तानची प्रमुख उत्पादने चहा आणि ज्यूट (ताग). पण याच्या निर्यातीतून मिळणारा पैसा वापरला जात होता पश्चिमेतल्या विकासासाठी. एकूणच पंजाबी–मुस्लिम राज्यकर्त्यांच्या मनात प्रथमपासूनच हा अहंकार होता की पूर्व पाकमधले लोक हे आपले गुलाम. संरक्षण खात्यातील ९०% अधिकारी पंजाबी मुसलमान असत. सर्व सरकारी यंत्रणांत यांचाच भरणा अधिक, त्याचं मुख्य कारण म्हणजे पंजाबची समृद्धी, सुपीक जमीन आणि त्याच्या बळावर फोफावलेली जमीनदारी वृत्ती.

त्याउलट महापूर, दुष्काळ अशा नैसर्गिक संकटांनी कायमचा ग्रस्त असलेला पूर्व पाकिस्तान पश्चिम पाकिस्तानातून येणाऱ्या अधिकाऱ्यांच्या भरण्यामुळे अन्यायी वागणुकीचे अनुभव घेऊ लागला. बंगाली लोकांच्या राष्ट्रभक्तीविषयी शंका घेतली जात होती. पूर्व विभागाच्या स्वायत्ततेची मागणी पाकिस्तानचे केंद्रीय नेते वारंवार फेटाळून लावत होते.

पूर्व बंगालच्या असंतोषाला प्रथम तोंड फुटले ते बंगाली भाषेच्या आंदोलनामुळे! ज्या संपूर्ण देशात वस्तुत: फक्त ३ टक्के लोकांची मातृभाषा उर्दू होती आणि केवळ ७ टक्के लोकच ती बोलू शकत होते. तिथे तिला पाकिस्तानची 'राजभाषा' बनविण्याचे प्रयत्न नेते करत होते. पूर्व पाकिस्तानातील लोकांचं (ज्यांना फाळणीपूर्वी बंगाली ही 'हिंदू' भाषा वाटे त्यांचा) बंगालीवरचं गाढ प्रेम जागं झालं. उर्दूच्या बरोबरीने बंगालीला

दर्जा मिळावा याकरिता १९४८ मध्ये विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने भाषिक आंदोलन उभे राहिले. त्यांच्या दबावापुढे पूर्व पाकिस्तानाचे तेव्हाचे मुख्यमंत्री खाजा नजिमुद्दिन जरा नमले. परंतु पंतप्रधान जीनांनी एका जाहीर सभेत या मागण्यांचा स्पष्टपणे धिक्कार केला. तेव्हा मात्र पूर्व पाकिस्तानाची निद्रिस्त अस्मिता जागी झाली. भर सभेत जीनांना आव्हान देणाऱ्या एका तरुण आवाजानं सुनावलं, 'असेल हिंमत तर आमची मागणी दडपूनच दाखवा !' या तरुणाचं नाव होतं 'शेख मुजीबूर रहेमान' भविष्यकाळातील स्वतंत्र बांगला देशाच्या लढ्याचे खंबीर नेतृत्व करणाऱ्या शेख मुजीबूर रहमानांच्या विचारांवर प्रभाव होता भारताचे लाडके सेनानी सुभाषचंद्र बोस! जीनांशी त्यांनी उघड संघर्ष सुरू केला. स्वाभाविकच त्यांची रवानगी ढाक्याच्या तुरुंगात झाली.



दुसरे प्रमुख बंगाली नेते हसन शहीद मुऱ्हावर्दी यांनी १९४९ मध्ये फॅसिस्ट (दडपशाही करणाऱ्या) नेत्यांविरूद्ध दंड थोपटून उभे राहायचे ठरविले आणि 'अवामी मुस्लिम लीग' ची स्थापना केली. त्यावेळी या पक्षाचे सरचिटणीस म्हणून शेख मुजीबूर यांची निवड करण्यात आली. त्यांच्याच सूचनेनुसार नंतर याचे नाव १९५३ मध्ये 'अवामी लीग' असे बदलण्यात आले. या पक्षाच्या निधर्मी प्रगतीशील लोकशाहीची मागणी करणाऱ्या रूपामुळे धार्मिक बळाचा वापर करणारे सत्ताधीश आणि भांडवलदार स्पष्ट झाले. 'अवामी लीग'ला दडपण्याचे त्यांचे प्रयत्न वेगात सुरू झाले.

याच काळात संपूर्ण पाकिस्तानातच राजकीय अस्थिरतेच्या एका भयंकर कालखंडाने जन्म घेतला. राष्ट्राध्यक्ष मिर्झांनी १९५८ मध्ये पाकिस्तानात लष्करी कायदा घोषित केला. जनरल अयूबखान हे नवे प्रधानमंत्री झाले. तर झुल्फिकार अली भुट्टो (बेनझीर भुट्टो यांचे वडील) हे व्यापारमंत्री झाले. अयूबखानांनी विश्वासघाताने राष्ट्राध्यक्षपद हिसकावून घेतले. संपूर्ण पाकिस्तानात एका दहशतीने भरलेल्या, सामान्य लोकांची होरपळ करणाऱ्या राजवटीला सुरुवात झाली.

या लष्करी कायद्याचा शेवट कसा झाला? त्यातूनच पूर्व पाकिस्तानमधील क्रांतीने कसा जोर धरला या प्रश्नांची उत्तरे पाहूया पुढील अंकात!

* * *

समृद्धीच्या मार्गावर

'शून्यातून हॉटेल विश्व' उद्योजक श्री. ओबेरॉय

– अजित ना. कानिटकर

'शून्यातून विश्व उभे करणे' असा शब्दप्रयोग मराठीत आपण नेहमीच करत असतो. जागतिक स्तरावर भारताची व भारतीय उद्योजकांची मान उंचावण्याचे प्रयत्न ज्या अनेक उद्योजकांनी केले त्यात एक महत्त्वाचे नाव आहे हॉटेल व्यावसायिक श्री.टी.एस.ओबेरॉय यांचे. ओबेरॉय यांचे नाव ऐकल्याबरोबरच आपल्या डोळ्यांसमोर उभी राहते ती २५-३० मजले इमारतींची उत्कृष्ट सेवा पुरवणारी पंचतारांकित राहण्याची निवासस्थाने म्हणजेच हॉटेल्स. अशा उत्कृष्ट हॉटेल्सचे जनक-निर्माते म्हणजे श्री. ओबेरॉय.

श्री. ओबेरॉय यांचे आई-वडील फाळणी होण्याअगोदर म्हणजे १९४७ पूर्वी पश्चिम पंजाबात होते. ओबेरॉय यांनी त्यांच्या आयुष्याची सुरुवात सिमला येथील एका हॉटेलात नोकरी करून सुरू केली. हे हॉटेल एका परदेशी मालकाचे होते व त्याची सर्व गिऱ्हाईके म्हणजे भारतात असलेले ब्रिटिश अधिकारी. ओबेरॉय यांनी ही नोकरी करत असताना अचूक बारकाव्यांसकट हा व्यवसाय कसा चालतो याची निरीक्षणे केली. एकीकडे नोकरी चालू असतानाच त्यांच्या मनात आकांक्षा निर्माण झाली की एक दिवस या परदेशी लोकांकडून मी स्वत:च हे हॉटेल विकत घेईन. ओबेरॉय यांच्या चरित्रात त्यांच्या या सुरुवातीच्या दिवसांचे वर्णन आहे. 'खडतर' या शब्दातच त्याचे वर्णन करता येईल. सिमल्याच्या थंडीत अपुरे कपडे, तोटके पैसे व केवळ प्रचंड इच्छाशक्ती याच्या जोरावर ते त्यांच्या आईला बरोबर घेऊन राहिले. तथापि चोख काम, चटपटीतपणा, ग्राहकांशी प्रसन्नपणे बोलून त्यांच्यावर छाप टाकण्याचे कौशल्य या गुणांमुळे काही काळातच हॉटेल मालकाच्या डोळ्यात ओबेरॉय यांची कामगिरी भरली व जेव्हा हे हॉटेल काही कारणाने विकण्याची वेळ त्या मालकावर आली तेव्हा



कृती करण्याचा सर्वात चांगला मुहूर्त म्हणजे ताबडतोब.

ओबेरॉय यांनी स्वत:च ते विकत घेण्याची तयारी दर्शवली!

ओबेरॉय यांची हॉटेल्स आज सर्व जगभर व शब्दश: प्रत्येक खंडात आहेत. अत्युत्तम दर्जाची सेवा पुरवणारी ही हॉटेल्स म्हणजे ओबेरॉय यांच्या महत्त्वाकांक्षेची ठळक उदाहरणे आहेत. तथापि ही उद्योगसंस्था उभी करण्यासाठी त्यांनी घेतलेले परिश्रम लक्षात ठेवण्यासारखे आहेत. जेव्हा परदेशात एक भारतीय नागरिक काही व्यवसाय निर्माण करतो तेव्हा दर्जाबद्दलची विशेष जागरूकता ठेवावी लागते. ओबेरॉय यांनी जगातली सर्व हॉटेल्स स्वत: फिरून पाहिली. त्यांचे बांधकाम कसे आहे याचे आराखडे बनवले. त्या ठिकाणी सेवा कशी पुरवली जाते याबद्दल तेथील कामगारांच्या मुलाखती घेतल्या, स्वयंपाकघरातील स्वैपाकांचे पदार्थ तयार करण्याची पद्धत पाहिली, खोल्यांमधील उशा-गाद्या-दिवे यांची मोजमापे घेतली! हे सर्व स्वत: पाहण्याचा त्यांचा एकमेव उद्देश होता म्हणजे ओबेरॉय हॉटेल्स त्याच तोडीची असावीत. त्यांच्या या हॉटेलमध्ये जगातील नामवंत व्यक्ती, अनेक देशांचे राष्ट्रप्रमुख - पंतप्रधान-राष्ट्राध्यक्ष येऊन राहून जातात. त्यामुळे भारताचे 'एक दूत' असाही त्यांचा लौकिक जगभर पसरला आहे.

उद्योगव्यवसाय करणाऱ्या व्यक्ती लांबचे पाहू शकतात. भविष्यात काय घडणार आहे याबद्दल त्यांचे चिंतन सतत चालू असते. अशा गुणांनाच दूरदृष्टी, आवाका (Vision) अशा प्रकारे वर्णन केले जाते. ओबेरॉय यांची नजर अशा दूरच्या संधी हेरणारी होती. मुंबईचे त्यावेळेस (सुमारे २५-३० वर्षांपूर्वी) समुद्रात भराव घालून नवीन जागा संपादनाचे काम चालले होते. सध्याचा नरिमन पॉईंट म्हणून ओळखला जाणारा भाग त्यावेळेस समुद्राचाच एक भाग होता. तो भाग व्यापारी इमारतींसाठी विकसित करण्याचे सरकारचे प्रयत्न चालू होते. हा भाग आणखी काही वर्षातच मुंबईचा महत्त्वाचा भाग होणार हे ओबेरॉय यांनी हेरले.

जागा विक्रीसाठी जेव्हा वेगवेगळ्या व्यक्ती व संस्थांचे प्रतिनिधी एकत्र जमले तेव्हा ओबेरॉय यांनी देऊ केलेली रक्कम इतरांपेक्षा तीन पट जास्त होती. याबद्दल त्यांच्या मित्रांनी त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, ''ही जागा - म्हणजे भविष्यात सोन्याचा तुकडा असणार आहे व त्यावरचे माझे हॉटेल म्हणजे जणू मोत्याचीच माळ. त्यासाठी धोका पत्करण्याची माझी तयारी नाही. न जाणो कोणी (माझ्यापेक्षा) जास्त किंमत देऊ केली तरी ही संधी हातातून सुटायची!''

संधीने कधी कुणाचा दरवाजा वाजवल्याचे ऐकीवात नाही. संधीचाच दरवाजा वाजवावा लागतो.



अशाप्रकारे मोक्याच्या जागा, ऐतिहासिक राजवाडे-महाल विकत घेणे व त्यांच्या जागी हॉटेल्स उभी करणे हा त्यांच्या उद्योजकतेमधील एक विलक्षणच गुण म्हटला पाहिजे. याच्या जोडीनेच ओबेरॉय यांना एक कुशल संघटक म्हणूनही उद्योगव्यवसायात ओळखले जाते. अशाप्रकारे भारतात व भारताबाहेरही उद्योग उभारणे म्हणजे त्यासाठी तरुण, कुशल व्यवस्थापक व नियंत्रक असणेही आवश्यक असते. ओबेरॉय यांनी अशी अनेक माणसे हेरून, त्यांना प्रशिक्षण देऊन या व्यवसायात तयार केली. किंबहुना अशाप्रकारे हॉटेल व्यवसायात काम करण्यासाठी लागणाऱ्या प्रशिक्षण संस्थेची स्थापनाही त्यांनी केली.

व्यावसायिक म्हणून जगभर वावरताना एक भारतीय म्हणून आपल्या देशाची मान उंच राहावी याची ओबेरॉय यांनी नेहमीच काळजी केली. असाच एक अनुभव त्यांच्या या वर्तणुकीवर प्रकाश टाकतो. ऑस्ट्रेलियात काही काम करत असताना तेथील वर्णद्वेषी वृत्तीचा त्यांना वाईट अनुभव आला. त्याविरुद्धचा निषेध म्हणजे तेथील राजवंशाचा एक जुना राजवाडा त्यांनी कित्येक वर्षांनंतर विकत घेतला व त्याची सर्व पुनर्रचना भारतीय वास्तुशास्त्र पद्धतीने करून त्या हॉटेलचे अत्यंत गाजावाजा करत उद्घाटन करून वर्णद्वेषवृत्तीस चपराकच लावली. असाच एक दुसरा प्रसंग त्यांच्या स्वाभिमानाचे द्योतक आहे. एका आंतरराष्ट्रीय कर्जपुरवठा करणाऱ्या संस्थेकडून त्यांनी उद्योगासाठी काही कर्जे घेतली होती. या संस्थेच्या अधिकाऱ्यांनी काही उद्दामपणे वर्तन करून ओबेरॉय यांचा अपमान केला. हा अपमान त्यांना फार झोंबला. स्वत:ची व्यक्तिगत संपत्ती गहाण टाकून, मित्रांकडून पैसे गोळा करून, उधारीवर घेऊन ओबेरॉय यांनी व्याजासकट हे कर्ज ६ वर्षे अगोदरच फेडले व आपल्या पराभवाचे उट्टे काढले!

अत्यंत कष्टातून वर येऊन स्वप्रयत्नावर केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही हॉटेल व्यवसायासारख्या उद्योगात दर्जा भारतीयांना गाठता येऊ शकतो याचे ओबेरॉय हे एक उत्तम उदाहरण आहे.

***

आधुनिक भोंडला गीते

उज्ज्वला सभारंजक

शारदोत्सव म्हणजे आनंदाचा सोहळाच असतो. नटून-थटून हत्तीभोवती फेर धरून गीते गाणाऱ्या बालिकांच्या प्रसंगाला आपल्याकडे 'भोंडला' म्हणतात. काही ठिकाणी यालाच 'हादगा' असेही म्हणतात. भोंडल्याची गाणी एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे अगदी सहजतेने आली आहेत, अजूनही येतात. याचे प्रमुख कारण म्हणजे, या गीतातील गेयता आणि चाली. लहान मुलींच्या ओठांवर ही गाणी सहज रुळतात. पण आता काळ झपाट्याने बदलतोय. काळाप्रमाणे या गाण्यांतही बदल करणे जरुरीचे वाटते. मात्र पूर्वीच्या भोंडला गीतांची लोकप्रियता आणि कर्णमधुरता लक्षात घेऊन त्याच साच्यात व त्याच चालीवर गाता येतील अशी गीते तयार केली आहेत.

गीतांचा आशय आजच्या बदलत्या काळाशी सुसंगत असावा. समाज परिवर्तनास हातभार या गीतांमधून लागावा. हा एक हेतू त्यामागे आहेच. नव्या पिढीने रुढी, परंपरा यातील इष्ट गोष्टींना विरोध करण्याचे कारणच नाही. फक्त या रुढींचा उपयोग व्यक्तिइतिहास आणि समाजहितास पोषक कसा होईल याचा विचार करून त्यामध्ये आवश्यक तो बदल केला आहे.

आजच्या चौकोनी कुटुंबात भांडाभांडी करायला भावंडांची संख्या कमी असते. एखादेच भावंडे असतानाही वादावादी होते. ती कामावरून ! मुलगा म्हणून त्यातून सुटका नाही ! हे सांगणारे नवे भोंडला गीत पाहा –

चाल – नणंदा, भावजया दोघीजणी ...

भांडण :

आई, वडील, भाऊ आणि बहिणी।
घरात नाही आणखी कोणी।।
घरातलं काम टाकलं कोणी?
मी नाही टाकलं दादानं टाकलं।
आपलं उष्टं तसंच ठेवलं।
घर सारं पसरून ठेवलं।
आता माझी आई येईल गं।
दादाचं नाव मी सांगेन गं।
दादा तुझ्या अंगी आहे मस्ती।
असूं दे जा गं तुझी काय धास्ती।
आई, बघना कटकट नुसती।
घे सोटा, उतरव ताठा।
घरादाराचा सुपुत्र मोठा।।

आपली कोणतीही कृती म्हणजे मनातील विचारांना आलेले मूर्त स्वरूप असते.

शरदचांदणे गीत गुणगुणे चढवित लेणे सृष्टीला, आकाशातील नक्षत्रांसम जाऊ नभाच्या संगतीला

यासाठी मनामनात सुविचारांची जोपासना झाली तर ते समाजहितास पर्यायाने देशहितास पोषक ठरते. या सद्हेतूने तयार केलेले नवे गीत –

चाल : अक्कण माती, चिक्कण माती...

अश्शी भूमी, पवित्र भूमी
सुरेख बाई, भारत भू मानावी
अस्सा भारत सुरेख बाई, येथेच जन्मावे
अस्सा जन्म सुरेख बाई, मानवदेह लाभावा
अस्सा देह सुरेख बाई, शक्ती बुद्धी लाभावी
अश्शी बुद्धी सुरेख बाई, सत्कार्या लावावी
अस्से सत्कार्य सुरेख बाई, शाबासकी मिळवावी
अशी शाबासकी सुरेख बाई, गुरुजनांनी ती द्यावी
अस्से गुरुजन सुरेख बाई, शील ते घडविती
अस्से शील सुरेख बाई, भूषण मानावे
आणा मनी, धरा ध्यानी, शील खरे भूषण!
शील खरे भूषण !!

भोंडल्याची पूर्वी जी गाणी होती त्यातून व्यक्तिगत, सामूहिक, सामाजिक व्यथा, प्रश्न यांनाही वाचा फोडली जात असे. या गीतांमध्ये थोडा अतिशयोक्तीपूर्ण विनोदही आहे. तशाच गीताचा आधार घेऊन आजच्या चढत्या महागाईचं वर्णन या गीतामध्ये केले आहे.

चाल : दमडीचं तेल आणलं ..... !

शेकड्याचं रेशन आणलं।
घरच्यांचं जेवण झालं।
पंचवीस पाहुणे जेवायला घातले।
साठवणीचं धान्य ठेवलं।
पायलीभर धान्य बहिणीला दिलं।
मोलकरणीला उसनं दिलं।
उरलेलं धान्य डब्यात भरलं।
चिमणीचा पाय लागला।
दारा पर्यंत रास गेली।
सगळी मेहनत वाया गेली।
आई – आई, घात झाला,
खायला दे आता दहीभात काला।
सांडलेलं धान्य तुम्हीच भरा।।

मुलींनो, तुम्हाला तर भोंडल्याची असंख्य गाणी येत असतील. त्याच चालीवर नव्या युगाचा संदर्भ जोडून नवी गाणी तुम्ही तयार करायची आहेत. तुम्हाला अभ्यास करून कंटाळा आला की अशी गाणी तयार करून बघा.

जाता जाता शारदेला पुढील गाण्याच्या माध्यमातून नमन करून वर मागता येईल.

चाल : एक लिंबू झेलू बाई,
दोन लिंबे झेलू .....

एक चाचणी झाली
आता दुसरी चाचणी झाली ...।
दोन चाचण्या झाल्या आता सहामाही आली।
अभ्यासाची गडबड सुरू झाली।
गृहपाठावर गृहपाठ झाले गं बाई।
लिहिता लिहिता शिणले गं बाई।
शारदेचा मग उत्सव केला।
सगळे झटले कार्याला।
उत्साहाने जमला मेळा।
सादर केल्या विविध कला।
प्रसन्नता मग आली मनाला।
शारदे, शारदे, देई वर,
आमच्या कार्या यशस्वी कर।।

* * *

एका क्षितिजाची गोष्ट

उषा आठवले

क्षितिजची शाळेची गडबड सुरू होती. 'ए आई, दप्तर भरून दे ना!' 'ए आई, – डबा कुठाय गं? 'आई, मला न्यायला येणारेस ना?' आई आज इंग्लिशचं खूप होमवर्क देणारेत. संध्याकाळी कुठे जाऊ नकोस. माझा अभ्यास घ्यायला थांब!'

या उद्‌गारांवरून असं वाटेल की क्षितिज हा एखादा पहिली – दुसरीत जाणारा मुलगा असेल. पण खरी गोष्ट काय आहे सांगू?

क्षितिज आपटे हा चांगला इयत्ता आठवीतला १४ वर्षांचा विद्यार्थी आहे. आई पदवीधर, वडील चांगल्या कंपनीत नोकरीला. घरामध्ये कशशा कशशाची म्हणून कमी नाही. क्षितिजला सायकल हवी? सायकल हजर. क्षितिजला नवा ड्रॉईंग सेट हवा? चला तर दुकानात. आज क्षितिज जरा कंटाळलेला दिसतोय. चला बाहेर जेवायला जाऊ.

अस्सा सगळा क्षितिजराजेंचा थाटमाट! क्षितिजसुद्धा तसा तरतरीत, बोलायला हुशार, प्राथमिक शाळेत असताना वर्गातही पुढे असायचा पण...

ह्या पणनेच सगळा घोटाळा केलेला. आता बघावं तर क्षितिजच्या प्रगतिपुस्तकात जिथेतिथे लाल रेघा, 'अभ्यासात मागे पडणारा' म्हणून शाळेनं शिक्का मारलेला. अभ्यास मुळी आवडतच नाही. आईनं जवळ बसून अभ्यास घेतला तरच स्वारी होमवर्क करणार. एकदा क्षितिजला आई रागावली पण क्षितिजवर परिणाम शून्य. बाबांना मुळी धंद्याच्या व्यापामुळे क्षितिजशी बोलायला वेळच होत नाही. मग जरी बाबांचा धाक असला तरी काय उपयोग?

अभ्यासाला बसला की चिडचिड सुरू...'हे पेन नको–हे खरखरीतच आहे' 'किती घाणेरडी कंपास आहे ! मी नाही ही वापरणार' 'सारख्या सारख्या काय गं चुका काढतेस आई?'

एकदा आई चांगलीच रागावली क्षितिजला. बाबाही मुद्दाम वेळ काढून रागवले. मग तर तो बिथरलाच. 'तुमचं मुळी माझ्यावर प्रेमच नाही. घराबाहेरच निघून जातो, आता बसा तुम्ही दोघंच घरात असं तावातावानं' म्हणून क्षितिज चपला घालायला लागला. कसंबसं आईनं शांत केलं त्याला.

खरंतर क्षितिज हुशार मुलगा आहे. सुरेख चित्रं काढता येतात त्याला. भटकायला, डोंगरदऱ्यात मुक्त हिंडायलाही आवडतं त्याला. शिवाय इतर लोकांशी तर त्याचं छानच जमतं.

मग घरीच का बरं असा वागतो तो? सारखा आईवर अवलंबून का असतो? अभ्यासाच्या नावानंच का बिथरतो?

लहानपणापासूनच क्षितिजला एकट्यानं स्वतंत्रपणे काही करण्याची मुळी सवयच नाही. त्यात तो जे म्हणेल ते हजर, अशी आईबाबांची तऱ्हा. त्यामुळे 'नकार'. ऐकायचीही सवय नाही. खरं म्हणजे त्यालाही समजतंय की आपण वागतो आहोत ते काही तितकंसं बरोबर नाही. पण त्याला कळतच नाहीये की आपण 'बदलायचं म्हणजे नेमकं काय करायचं ते!'

क्षितिजनं जर मनात ठरवलं तर त्याला कितीतरी गोष्टी करता येतील. ज्यामुळे त्याचा अभ्यास तर सुधारलेच. शिवाय त्याला स्वत:च्या लपलेल्या अन्य गुणांचीही ओळख होईल.

क्षितिजनं हळूहळू थोडा वेळ अगदी एकट्यानं, आपला आपण अभ्यास करायला बसलं पाहिजे. थोडं चुकलंमाकलं तरी चालेल. पण आता आठवीत गेल्यावर आईबाबांची कुबडी बाजूला करायला शिकलं पाहिजे. एकदा त्यानं अभ्यासाचं वेळापत्रक करून बघावं. शक्यतो इतरांनी त्यात लुडबूड न करता अडचण आली तरच मदत करावी. 'स्वत:ची जबाबदारी' म्हणजे काय हे क्षितिजला समजेल.

रोज थोडातरी मोकळा वेळ क्षितिजला मिळतो. तेव्हा जर त्यानं जाणीवपूर्वक आपले छंद जोपासले तर त्यालाही कंटाळा येणार

नाही. सुट्टीत मुद्दाम हस्तकला, चित्रकला अशा विषयांच्या प्रशिक्षण वर्गाला त्याला जाता येईल आणि महत्त्वाचं म्हणजे एकट्यानं, जबाबदारीनं काही काम करता आलं पाहिजे. हे शिकण्यासाठी 'ट्रेकिंग'ला किंवा एखाद्या शिबिराला जाण्याचा उपयोग निश्चितच होईल.

असे किती छोटे छोटे प्रश्न मोठे वाटत असतात आपल्याला पण विचार केला आणि अंमलात आणला तर सहज सोपे होऊन जातात. नाही का?

* * *

स्वत:वर विश्वास असू द्या. दृढविश्वासातूनच थोर कार्ये जन्मत असतात.

आकाश दर्शनाचा आनंदसोहळा

प्रा. प्र.के.घाणेकर

डोळस भटकंती– ३

सुट्टी आली की पाठपिशवी घ्यावी. त्यात तहानलाडू, भूकलाडू भरावेत, अंथरूण–पांघरूण घ्यावं, पायात बुटांचे खूर चढवावेत आणि मस्त भटकंतीला बाहेर पडावं हे मला मनापासून आवडतं. अशा अनगड, पगडंडीत एखाद्या किल्ल्यावरील मोकळवणात उशाशी धोंडा घेऊन जमिनीला पाठ लावावी तर रात्रीच्या वेळी आभाळीच्या काळ्या घुमटाला लक्षलक्ष चांदण्या लगडलेल्या दिसतात. आपल्या शहरी जीवनात एकतर आकाशाकडे आपलं लक्ष जातच नाही आणि गेलं तरी विद्युत्दीपांनी उजळलेल्या आकाशात फारशा चांदण्याच दिसत नाहीत. शहर सोडून दूर गेलं की हे आभाळवैभव पाहता येतं.

''शशी सूर्य समरांगणे मेघमाळा' हे सारं

पाहायचं प्रकरण सोपं आहे. पण त्याची ओळख पटवणं, ते सारं लक्षात ठेवणं हे मात्र निश्चितच अवघड आहे. त्या साऱ्यांची ग्रंथगत माहिती आपल्या डोक्यात कोंबून ठेवणंही काही सोपं नाही. आकाशाच्या अंगणात काढलेल्या रांगोळीकडे आपले पूर्वजही आकृष्ट झाले होते. चंद्रसूर्य

तारामंडळे, नाना नक्षत्रे ग्रहमंडळे। शेषकूर्म मेघमंडळे, नभामाजी तारांगणे।।

असा संदर्भ आपल्याला समर्थांच्या साहित्यातही आढळतो. रामदासांसारखा विरक्त योगी खरा निसर्गपुत्रच होता. आपल्या भवती होणारे फेरबदल त्यांनी अचूक टिपून मोठ्या सूचकतेने त्यांचा उल्लेख आपल्या साहित्यात केला आहे.

अकस्मात मागे भूमिकंप झाला।
नभामाजी तारेसी शेंडा निघाला।।

हा त्यांनी केलेला उल्लेख धूमकेतू बद्दल आहे. आपल्या भटकंतीत रात्रीच्या मिट्ट काळोखात दिसणाऱ्या ग्रह-तारे-नक्षत्र-उल्का-धूमकेतू अशा कितीतरी गोष्टींचा परिचय करून घेणं शक्य होतं. आकाशनिरीक्षणासाठी महागड्या दुर्बिणी अन् अवजड वेधसाधनेच लागतात हा समज मात्र दूर करायला हवा.

सृष्टिज्ञान-आकाश दर्शन 'ॲटलास' अथवा 'हा तारा कोणता?' हे प्रा.गो.रा.परांजपे यांनी लिहिलेलं उत्कृष्ट पुस्तक १९७२ मध्ये महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने प्रसिद्ध केले. त्याची पहिली आवृत्ती अवघ्या साडेबारा रुपयांत उपलब्ध होती. मुख्यत्वे महाराष्ट्रातून दिसणारं आकाश नजरेसमोर ठेवून दर महिन्यातील आकाश दाखविणारे नकाशे अतिशय सुबक व अचूक काढले आहेत. ते नेमके कसे वापरावेत याबद्दल बारीकसारीक सूचना तपशीलाने दिलेल्या आहेत. कोणाही एकलव्याला गुरूशिवाय आकाश परिचय करून घ्यायचा तर हे पुस्तक डोळ्याआड करून चालणार नाही.

वेगवेगळ्या राशी, नक्षत्रे, तारकासमूह यांचीही सविस्तर माहिती सुबक आकृत्यांसह दिलेली आहे. त्यासंबंधीच्या प्राचीन कथा, ज्योतिर्विद्याशास्त्रीय वैशिष्ट्ये असं सारं काही सहज सोप्या भाषेत दिल्याने पुस्तकाची उपयुक्तता खूपच वाढली आहे. दिशा ठरविणे, काही संज्ञा व त्यांची स्पष्टीकरणे, कालमापन, नामकरण, अंतरे, दुर्बिण, उल्का, धूमकेतू, रेडिओ-दुर्बिणी अशा अनेक गोष्टी सुबोध भाषेत मांडल्या आहेत.

हे पुस्तक पाहणं-चाळणं-वापरणं हा अभ्यास आणि आनंद यांचा एकत्रित अनुभव देते. हा अनुभव स्वत: घेणं याला अन्य पर्याय नाही. मी हा अनुभव अनेक वेळा घेतला आहे. तुम्हीही तो घ्यावा असं मला वाटतं.

नक्षत्रलोक –

पंडित महादेवशास्त्री जोशी हे अद्‌भुत रसायन होतं. अनेक विषयांवर अतिशय आकर्षक भाषेत समर्पक संदर्भासहित लिहिण्याची लोकविलक्षण हातोटी त्यांना लाभली होती. १९७३ मध्ये या सुंदर पुस्तकाची द्वितीय आवृत्ती प्रकाशित झाली तेव्हा ते सहा रुपयांना मिळत होतं. सत्तावीस नक्षत्रं, त्यांच्याबद्दलच्या भारतीय व पाश्चात्य लोककथा, आकाशात ते नेमकं कसं ओळखावं अशी सारी माहिती प्रासादिक भाषेत शास्त्रीबुवांनी लिहिली आहे. हे पुस्तक

वाचलं तर वाचकाला एकदा तरी आकाशाकडे नजर टाकाविशी निश्चितपणे वाटेल. या नक्षत्रांबद्दल आपलेपणा वाटावा अशा पौराणिक गोष्टी वाचताना रंगून जायला होतं. कितीही वेळा वाचलं तरी पुन्हा पुन्हा वाचावं असं हे पुस्तक आहे.

मराठी विज्ञान परिषद – पुणे विभागानं आपटे कुटुंबियांच्या मदतीनं दरवर्षी एका वेगळ्या विषयावर आटोपशीर पुस्तक अभ्यासू व्यासंगी लेखकांकडून लिहून घेऊन प्रकाशित करायचं असा उपक्रम १०–१२ वर्षे सातत्याने चालू ठेवला आहे. १९९० साली ''नुसत्या डोळ्यांनी आकाशदर्शन'' हे पुस्तक प्रख्यात खगोल निरीक्षक व अभ्यासू अशा श्री. हेमंत वा. मोने या शिक्षक मित्राकडून लिहून घेतले आणि प्रकाशित केलं. घराबाहेर पडणाऱ्या निसर्ग अभ्यासकाला अतिशय उपयुक्त ठरणारं हे ऐंशी पानांचं पुस्तक त्यांनी अवघ्या पाच रुपयांना उपलब्ध केलं आहे. तात्त्विक भाग सोप्या भाषेत समजावून देणं आणि खगोल निरीक्षकाच्या मदतीनं खगोल समजावून घेणं कसं सोपं आहे, हे या पुस्तकामुळे कळतं. या अल्पमोली पुस्तकाचा उपयोग मात्र भरपूर होतो.

अर्थात, याशिवाय आणखीही काही पुस्तके उपलब्ध असणारच. धूमकेतू, खग्रास सूर्यग्रहण, चांद्रविजय, उल्कापात व उल्काघाती खळगे अशा बारीकसारीक विषयांवरही लहानमोठी पुस्तकं आहेतच. श्री. त्र्यं.गो. ढवळे यांचं ज्योतिर्वैभव हे पुस्तक सुरुवातीला जरी क्लिष्ट वाटलं तरी सरावाने समजावून घ्यायला फारशी अडचण येत नाही, हे नक्की.

निसर्गाबद्दल गोडी असणाऱ्यांनी हा आकाशपट ओळखीचा करून घ्यायला हवा. त्यासाठी ही पुस्तकं वाचायला हवीत. आकाशनिरीक्षण कोणालाही सहज जमू शकेल, फारसा खर्चही न करता त्यातील बारकावे समजावून घेता येतील. चंद्र-सूर्य ग्रहणं, उल्का-अशनी ह्या आकाशीय गोष्टी समजावून घेऊन संधी मिळेल तेव्हा ते स्वत: पाहायला जाणं हेही तितकंच महत्त्वाचं.

लहान वयातच आकाशनिरीक्षणाची गोडी लागली तर भावी काळात त्याचा खूप फायदा निश्चित होतो. एकदा का आकाशनिरीक्षणाची गोडी लागली की रात्रीचा दिवस कसा होतो अन् ही रात्र संपूच नये हे कसं वाटतं ते मात्र तुमच्यावर खास अनुभवण्यासाठी सोडून देतो!

* * *

'ज्ञान प्रबोधिनी' द्वारा आयोजित
स्वयं अध्ययन कौशल्य प्रशिक्षण वर्ग

८ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी

अभ्यास कसा करावा हे आधुनिक तंत्रे, प्रात्यक्षिक व सराव पाठ यांच्या साहाय्याने या वर्गात येऊन शिका!

- वाचन वेग कसा वाढवावा
- लक्षात कसे ठेवावे
- टिपणे कशी काढावीत
- मुद्देसूद सुंदर शैलीत कसे लिहावे
- परीक्षेची पूर्व तयारी कशी करावी.

कालावधी : ३० ऑक्टो. ते ४ नोव्हें. ९५ सोमवार ते शनिवार

वेळ : दुपारी २ ते ५

शुल्क : रु. १००/- फक्त

माध्यमिक शिक्षकांसाठी कार्यशाळा

स्वयं अध्ययन कौशल्ये-श्रवण, वाचन, स्मरण टिपण, लेखन व नियोजन.

कालावधी : २७ आणि २८ ऑक्टोबर ९५ शुक्रवार ते शनिवार

वेळ : दुपारी १२ ते ५

शुल्क : रु. १०० फक्त

नाव नोंदणी (दोन्ही वर्गांसाठी)

१६ ऑक्टोबर ९५ पासून
रोज सायं. ५ ते ७ या वेळेत

स्थान : 'छात्र प्रबोधन' कार्यालय
ज्ञान प्रबोधिनी,
५१०, सदाशिव पेठ,
पुणे-३०

इ. १० वी तील सभासदांसाठी दिवाळीच्या सुट्टीत

राष्ट्रीय प्रज्ञा शोध मार्गदर्शन वर्ग

राज्यस्तरावरील परीक्षेबाबतचे मार्गदर्शन व त्याबरोबर अभ्यास कसा करावा याचेही मार्गदर्शन.

कालावधी : १५ ऑक्टो. ९५ ते २१ ऑक्टो. ९५ **शुल्क रु.** १५०/- (निवास-भोजन सोडून)

(निवास-भोजनाची व्यवस्था करावयाची असल्यास रु. २००/- जास्तीचे भरावे लागतील.)

(ज्यांनी पत्राद्वारा मार्गदर्शन योजनेत भाग घेतला नसेल अशांना विविध प्रश्नसंचांसाठी रु. २५०/- जादा भरावे लागतील.)

नावनोंदणी : या वर्गाची नावनोंदणी ५ ऑक्टोबरपर्यंत स्थानिक कार्यालयात अथवा १० ऑक्टोबरपर्यंत मुख्य कार्यालयात करावी. नावनोंदणी करताना आपला पूर्ण पत्ता व दूरभाष क्रमांक (फोन नंबर) कळवावा म्हणजे शिबिराची माहिती कळवणे सोपे जाईल. १० ऑक्टोबरपर्यंत झालेल्या नावनोंदणीप्रमाणे पुरेशी नावनोंदणी न झाल्यास शिबिर रद्द केले जाईल व तसे संबंधितांना कळवले जाईल. त्यांचे शुल्क त्यांना परत मिळेल.

किनारती कनकाच्या धारा उदयगिरीवरती जगावर अभिनव ये कांती।

तंबूतील शिबिर व गिरिभ्रमण
दीपावलीची सुट्टी अनुभवसमृद्ध करण्याची सुवर्णसंधी!

- *डोंगर दऱ्यामध्ये, स्वच्छ मोकळ्या वातावरणात स्वच्छंदीपणे विहरायचं...*
- *सह्याद्रीच्या कुशीत निसर्गनिरीक्षणातून पक्षी-वनस्पती-नक्षत्रे यांची ओळख करून घ्यायची...*
- *मराठमोळ्या, रांगड्या मुलखात भरपूर दमायचं, त्यांच्यातच मिसळायचं...*
- *४ भिंतीच्या आत सुरक्षित अन् सुखवस्तू आयुष्यात न येणाऱ्या अडचणींना, प्रसंगांना सामोरं जायचं*
- *अनुभव अन् आत्मविश्वास मिळवायचा...*

या सर्वांबरोबर मनसोक्त मजा आणि विविध गमती-जमती आहेतच!

हे सर्व अनुभवण्याची संधी दडवू नका !!

कालावधी : २७ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर ९५
वयोगट : इ. ८ वी ते १२ वी (मुला-मुलींसाठी स्वतंत्र शिबिरे)
शुल्क : रु. ३००/- (शिबिर काळातील भोजन-निवास-प्रवास इ.सह)

प्रवेश संख्या मर्यादित ! लवकरात लवकर स्थानिक केंद्रांवर अथवा मुख्य केंद्रांमध्ये शुल्क भरून नावनिश्चिती करा.

सुट्टीत पैसे कमवा!

अनेक मान्यवर व्यक्तींच्या कथा-कविता लेख यांनी सजलेला 'छात्र प्रबोधन' चा यावर्षीचा दीपावली विशेषांक तयार होत आहे. १२ ऑक्टोबर पर्यंत तो स्थानिक कार्यालयांमध्ये उपलब्ध होईल.

यावर्षीच्या दीपावली विशेषांकात २४ ऑक्टोबरचे सूर्यग्रहण पाहता यावे यासाठी खास तयार केलेला 'सूर्यचष्मा' भेट म्हणून दिला जाणार आहे. त्यातून सूर्याकडे पाहण्यापूर्वी तो कसा वापरायचा याबाबतच्या सूचना नीट वाचा व नंतरच त्याचा उपयोग करा.

सर्व सभासदांना त्यांच्या वर्गणीमध्येच हा दीपावली विशेषांक मिळेल. त्याची वितरण व्यवस्था शेवटच्या पानावर दिली आहे.

आपण आपल्या मित्र-मैत्रिणी, नातेवाईक, परिचित व अपरिचित व्यक्तींना हा दीपावली विशेषांक विकून त्यातून पैसे मिळवू शकता.

छापील किंमत रु. ३०/-

प्रत्यक्ष सवलतीची किंमत प्रति अंक खालीलप्रमाणे

• १ ते ५ अंक विकल्यास २५/- • ६ ते १० अंक विकल्यास २३/- • १० पेक्षा अधिक अंक विकल्यास २१/-

यानिमित्ताने 'छात्र प्रबोधन' अनेकांपर्यंत पोहोचवण्यास हातभार लावता येईल व दिवाळीतील फटाक्यांसाठी, भाऊबीजेसाठी अथवा अन्य गोष्टींसाठी स्वकष्टाची कमाई वापरता येईल.

पालकांना विशेष विनंती : यावर्षी आपण आपल्या आप्त मित्रांना दीपावलीनिमित्त जी शुभेच्छा पत्रे पाठवाल त्यासोबत छात्र प्रबोधनचे एक माहितीपत्रकही पाठवावे. अशी माहितीपत्रके स्थानिक केंद्रावर उपलब्ध आहेत. ती आपल्या मागणीप्रमाणे मिळू शकतील.

छात्र प्रबोधन दीपावली विशेषांक

सभासदांच्या सोयीसाठी स्थानिक केंद्रांवरच दीपावली अंकाची वितरण व्यवस्था खालील उपकेंद्रांवरही करण्यात आली आहे. अंक घेण्यासाठी शक्यतो सभासदांनी स्वत: यावे. येताना पावती अथवा हा अंक बरोबर घेऊन यावा. १५ ऑक्टोबर (२२, २३, २५ सोडून) या कालावधीत सायं. ५ ते ७ या वेळात आपण आपला अंक घेऊन जावा. बरोबर वही पेन आणावे. एक छोटीशी प्रश्नावली आपल्याला भरून द्यावयाची आहे. छात्र प्रबोधनची विविध पुस्तके या केंद्रांवर आपण पाहू शकाल. आपल्याला ती विकत हवी असल्यास स्थानिक केंद्र अथवा मुख्य केंद्रांमध्ये मिळू शकतील. ज्या ठिकाणी उपकेंद्रे जाहीर केली नाहीत त्या सर्व ठिकाणी स्थानिक केंद्रांमधून अंक घेऊन जावा.

स्थानिक उपकेंद्रे

सांगली

१) गोरक्षनाथ अप्पाजी इनामदार
व्ही-११, वंदन अपार्टमेंट, चिनार हॉटेल
जवळ, नेमिनाथ नगर, विश्रामबाग, सांगली

नाशिक

१) सौ. मंगला धाडणकर
२ ब, के.जे. अपार्टमेंट, ज्योती कलशसमोर
राका कॉलनी, नाशिक - २

२) कु. सुषमा वसंत जोशी
पुष्कर सोसायटी (L.I.C.), रथचक्र सोसा. मागे
इंदिरानगर, नाशिक - ९

नगर

१) डॉ. श्री. वा. जोशी
अंबिका नर्सिंग होम, पुणे नगर रस्ता,
केडगाव, अहमदनगर - ५.

२) श्री. संतोष गंगाधर दंडवते
७८, म्युनिसिपल कॉलनी
टी.व्ही. सेंटर समोर, अहमदनगर

कोल्हापूर

१) सौ. रेखा शहा
द्वारा : डॉ. बी.बी. शहा
१६ सम्राटनगर, कृष्णाई बंगल्याशेजारी
कोल्हापूर, फोन ६५९८९७

पुणे

१) सौ. ज्योती पोतदार
३६/२ बी १, अमृता सोसा.
वामन निवास समोर
पौड फाटा, पुणे - ३८.

२) सौ. नलिनी विष्णू नवरे
३६/१० आम्रपाली, तुळशीबागवाले
कॉलनी, सहकारनगर नं. २
दशभुजा गणपती जवळ, पुणे - ९

३) सौ. जयश्री शिदोरे
३२, कल्याण, गल्ली, क्र. ९
नटराज सोसा., भगिनी निवेदिता बँकेजवळ,
कर्वेनगर, पुणे - ५२.

४) योगेश पाटणकर
बी-६-११, गुरुराज सोसायटी
पद्मावती, पुणे-सातारा रस्ता, पुणे - ३७

५) सौ. वृशाली देशपांडे
अंजना अपार्टमेंट्स, फ्लॅट नं. १२
आनंदनगर, हिंगणे खुर्द,
आनंदनगर पोस्ट ऑफिस जवळ, पुणे-५१

औरंगाबाद

१) सौ. न्यायाधीश,
शारदा मंदिर शाळा, औरंगाबाद.

हे मासिक 'ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून सौर आश्विन १ शके १९१७, २३ सप्टें. १९९५ या दिवशी प्रभात प्रिंटिंग प्रेस येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे प्रसिद्ध केले आहे.

हा तिरंगी झेंडा, गर्वाने गगनी उभवू। अन् गर्जत दाही दिशांनी, जयघोष घुमवू।।

दीपावली विशेषांक वितरण व्यवस्था

दीपावली विशेषांक पोष्टाने पाठविल्यास तो मोठ्या प्रमाणावर गहाळ होतो असा दोन वर्षांचा अनुभव आहे. त्यामुळे ज्या ज्या ठिकाणी स्थानिक केंद्रे आहेत त्या ठिकाणांवरून त्या शहरातील सभासदांनी १५ ऑक्टोबर १९९५ नंतर दीपावली विशेषांक पावती अथवा हा अंक (वर्ष ४ अंक ३) दाखवून समक्ष घेऊन जावा. काही शहरांमध्ये उपकेंद्रे सुरू झाली असून आपल्या सोयीनुसार आपण तेथूनही दिवाळी अंक नेऊ शकाल अशा उपकेंद्राचे पत्ते आतील पानावर दिले आहेत. त्या निमित्ताने स्थानिक कार्यालय व केंद्रप्रमुख यांची ओळख व्हावी, ज्ञान प्रबोधिनीव्दारा प्रकाशित पुस्तके पाहून ती तुम्ही संग्रही ठेवावीत व स्थानिक केंद्रांव्दारा चालविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती घेऊन त्यात तुम्ही सहभागी व्हावे अशी अपेक्षा आहे.

त्यातूनही ज्यांना अंक पोस्टाने घरपोच हवे असतील त्यांनी १० रुपये मुख्य केंद्राकडे पाठवावेत. त्यांना रजिस्टर्ड पोस्टाने अंक पाठविले जातील.

'छात्र प्रबोधन' ची स्थानिक कार्यालये

निगडी : ज्ञान प्रबोधिनी नवनगर विद्यालय, पेठ क्र. २५, निगडी, पुणे ४४. ☎ ८४३८०

सोलापूर : ज्ञान प्रबोधिनी बालविकास मंदिर, डफरीन चौक, सोलापूर. ☎ २५७८२

सातारा : श्री. सतीश कुलकर्णी, प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२०/अ, अंजली कॉलनी, करंजे तर्फ, सातारा. ☎ ५०५०४

सांगली : श्री. शैलेंद्र केळकर, ६९२, गाव भाग, खाडीलकर गल्ली, सांगली.

कोल्हापूर : डॉ. शुभांगी कुलकर्णी (सोलापूरकर), आशीर्वाद हॉस्पिटल, विनखांवी गणेश मंदिराजवळ, कोल्हापूर. ☎ २१५३४

नाशिक : सौ. साधना गाडगीळ, रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म. गांधी रोड, नाशिक ☎ ५७४८३०

मुंबई : श्री. अनिल यशवंत दांडेकर, विश्वस्तः अवध्य चॅरिटिज्, ५२ए, सह्याद्री, बजाज हॉलसमोर, ५० स्वामी विवेकानंद रस्ता, मालाड (प.), मुंबई - ५४. ☎ ८७२५३१९

ठाणे : डॉ. अजित दातार, बी-२०, अहिल्या सोसा., घंटाळी रोड, ठाणे (प.) ☎ ५४१०८७

पनवेल : सौ. मेधा मयुरेश सोहोनी, पी. एल-६-१३-६ सेक्टर १७ सिडको कॉलनी, अभ्युदय बँकेमागे, नवीन पनवेल.

रत्नागिरी : कु. नीता अ. श्रीखंडे, २९२३, जोशीवाडा, नवी मंडई रस्ता, रत्नागीरी. ☎ २२४८७

धुळे : सौ. उषा पाठक, धुळे अर्बन बँक, गरुड बाग, धुळे. ☎ २३४८७

चाळीसगाव : श्री. विंचूरकर, मुख्याध्यापक गुरूकुल माध्यमिक विद्यालय, चाळीसगाव.

परभणी : श्री. दिलीप राके, 'पारस' नाथनगर, परभणी किंवा बाल विद्यामंदिर, परभणी.

लातूर : अरुणा देवधर, विद्यानगर, विवेकानंद रुग्णालय, लातूर. ☎ ४३६१४

औरंगाबाद : कर्नल पी. एन्. मोडक, प्लॉट नं. ३०६/३०७ सेक्टर नं. 'C' N-1 भक्तीनगर, गणेश मंदिराजवळ, सिडको, नवीन औरंगाबाद. ☎ ४८२६२६

स्थानिक केंद्रे नसलेल्या गावांमध्ये दिवाळी अंक पुस्त-डाक (Book-Post) ने पाठविले जातील. त्यांनाही अंक रजिस्टर्ड पोस्टाने हवा असेल तर त्यांनी १० रुपये मुख्य केंद्राकडे पाठवावेत. नाव व सभासद क्रमांक कळवावा.

दीपावली विशेषांक स्थानिक केंद्रावर सुटे विक्रीसाठी उपलब्ध आहेत.

अधिकाधिक जणांपर्यंत दीपावली विशेषांक पोहोचवा !

टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन - PNCW / 349 तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र. १२८

शुभ्र सुगंधित...

शुभ्र सुगंधित पुष्पे आणिक शुभ्र सुगंधित मने
मातृभूमि तव चरणी याहुन अन्य काय अर्पिणे ?
हे अमुचे सश्रद्ध समर्पण स्वीकारी वरदे
अमुच्या शुभव्रतांना आई, तुझे शुभाशिष दे ॥ध्रु.॥

उपासनेला दृढ चालविणे ही अमुची साधना
दिव्यद्युतीला अवतरणास्तव करितो आवाहना
त्या तेजाने आई अमुचे अन्तर धवळू दे ॥१॥

केसरिया जोहार येथले इथली बलिदाने
'सर देईन परि सार न देईन' हे कणखर बाणे
असा वारसा पेलायास्तव वज्राचे बल दे ॥२॥

स्नेहाचा हृद्‌बंध हवा अन् शक्ति हवी आई
सकलांची सामर्थ्ये जडविल जी तुझिया पायी
तुझ्याच गौरवगानासाठी अतुल संघस्वर दे ॥३॥

भविष्यवेधी स्वप्नदर्शिनी प्रतिभा आम्हा दे
रूप तुझे पालटण्यासाठी दृढतम बाहू दे
प्रेय-श्रेय ते सर्वच अन्ती तव पदि वाहू दे ॥४॥

संपर्क पत्ता :
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे ४११ ०३० ☎ ४७७६९१
कार्यालयाची वेळ : स. १० ते संध्या. ७
या अंकाची किंमत : रुपये ६/-
वार्षिक वर्गणी : रुपये ७५/-
प्रकाशन दिनांक : १ आश्विन, शके १९१७
२३ सप्टेंबर, १९९५